उत्कृष्ट क्वालिटी
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर,
पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.७ ■ गुरूवार ८ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.

१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## भारतासारखी पुण्यभूमी जगात कुठेही शक्य नाही पद, प्रतिष्ठेपेक्षा देशसेवा मोठी ; पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली, दि. ७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सार्वजनिक जीवनातील पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दिल्लीतील जनतेला संबोधित करताना आपल्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाचा आढावा घेतला. सात ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर आज प्रशासनातील २५ वर्षे पूर्ण झाली, हा जनतेच्या विश्वासाचा आणि आशीर्वादाचा परिणाम असल्याचे मोदी यांनी सांगितले. मोदी म्हणाले की, जेव्हा गोष्ट देशाची असते, तेव्हा पद, प्रतिष्ठा आणि अधिकार यांना काहीही महत्त्व नसते. देशासमोर सत्ता सुख काहीही मोठे नाही. पद आणि प्रतिष्ठा जगात कुठेही मिळू शकते; मात्र भारतासारखी पुण्यभूमी कुठेही मिळणार नाही, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.**



मी महत्त्वाकांक्षेसाठी नाही, मिशनसाठी जगतो, असे स्पष्ट करीत पंतप्रधान मोदी म्हणाले. आपल्या पंचवीस वर्षांच्या प्रवासाबद्दल बोलताना मोदी यांनी सांगितले की, गेल्या वर्षांकडे लोक उपलब्धी म्हणून पाहतात; मात्र त्यांच्यासाठी हा व्यक्तिगत महिमामंडनाचा विषय नाही. आपल्या जीवनाचे एकच ध्येय राहिले असून ते म्हणजे देशाची निरंतर सेवा. मी महत्वाकांक्षेसाठी नव्हे, तर मिशनसाठी जगणारा माणूस आहे. मला जी जबाबदारी मिळाली ती मी निभावत गेलो. कर्म माझ्यासाठी देशसेवेची साधना आहे, असे मोदी यांनी सांगितले.

**जनतेच्या विश्वासाबद्दल कृतज्ञता**

पंतप्रधान मोदी यांनी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये आपल्याला सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल जनतेचे आभार मानले. मी जनतेच्या चरणी नतमस्तक होतो, असे म्हणत त्यांनी भारतीय जनता पक्ष आणि एनडीएवर विश्वास ठेवणाऱ्या राजकीय पक्षांप्रतीही कृतज्ञता व्यक्त केली. देशातील १.४ अब्ज नागरिकांची सेवा करण्यासाठी अधिक जोमाने काम करण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थना आपण केली असल्याचेही मोदी यांनी सांगितले.

**बुद्धापासून विवेकानंदांपर्यंत उल्लेख**

भारताच्या वैचारिक परंपरेचा उल्लेख करताना मोदी यांनी बुद्धापासून स्वामी विवेकानंदांपर्यंतच्या विचारधारेची जोपासना करणाऱ्या राष्ट्राची सेवा करताना कधीही एकटेपणा जाणवला नाही, असे सांगितले. माझ्यासाठी लोकच देव आहेत. देशाने मला खूप काही दिले आहे, त्यामुळे देशाप्रती माझी जबाबदारी अफाट आहे, असेही मोदी यांनी म्हटले. गरीब आणि गरजूंची सेवा करणे हे आपले अविचल कर्तव्य असल्याचे सांगत, आम्ही मानवतेचे सेवक आहोत; सेवा हा आमचा धर्म आहे, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

## दिल्लीत दहाच्या आंदोलनास सीजेपीला परवानगी नाही

नवी दिल्ली, दि. ७ : कॉक्रोच जनता पक्षाने दहा ऑक्टोबरला दिल्लीत आंदोलन करण्याची तयारी सुरू केली आहे. याबाबत दिल्ली पोलिसांना माहिती देण्यात आली आहे. मात्र, पोलिसांनी अद्याप या आंदोलनाला परवानगी दिलेली नाही. त्यातच नवी दिल्ली परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १६३ लागू असल्याने आंदोलनाच्या परवानगीबाबत निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

सीजेपीचे सौरभ दास यांनी हे केवळ सीजेपीचे आंदोलन नसून जेन-झी चे आंदोलन असल्याचे म्हटले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटविण्याची मागणी करत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. नवी दिल्ली परिसरात सध्या बी.एन.एस. एस. चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे. त्यामुळे दहा ऑक्टोबरला प्रस्तावित आंदोलनाबाबत (पान ४ वर)

## दिल्लीत राहुल गांधी पुन्हा गनीमी काव्याने निवडणूक आयोग कार्यालयावर धडकणार

**नवी दिल्ली, दि. ७ : काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या दिल्लीतील जनपथ येथील निवासस्थानी झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर विरोधी पक्षांचे खासदार पुन्हा एकदा निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे मोर्चा काढण्याच्या तयारीत आहेत. मंगळवारी रात्री राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र, या कारवाईनंतरही विरोधकांनी आंदोलन मागे न घेण्याची भूमिका घेतली आहे. देशातील लोकशाही धोक्यात आणणाऱ्यांना शिक्षा मिळणारच, असा इशारा लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी त्यांनी दिला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना राजीनामा द्यावाच लागेल, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य निवडणूक आयुक्तांची भेट घेण्यापासून का रोखले जात आहे. निवडणूक आयोग ही निष्पक्ष आणि स्वतंत्र संस्था उरलेली नाही का? असा प्रश्न सीजेपीच्या नेत्यांनी उपस्थित केला आहे.**



**दिल्लीत कडेकोट बंदोबस्त**

विरोधी खासदार पुन्हा निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे कूच करणार असल्याचे संकेत मिळाल्यानंतर दिल्ली पोलीस सतर्क झाले आहेत. दिल्ली पोलिसांसह निमलष्करी दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. विरोधी खासदारांचा मोर्चा निवडणूक (पान ४ वर)

## जिल्ह्यातील मतिमंद, ऑटिझम, बहुअपंगत्वाचे दाखले देण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे वेळ नाही

**धुळे, दि.७- धुळे जिल्ह्यातील मतिमंद, ऑटिझम आणि बहु-अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या हक्कांचे रक्षण करणाऱ्या कायदेशीर पालकत्वाचे (लिगल गारडीयनशीप ) अर्ज गेल्या तीन वर्षांपासून जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या गंभीर संवेदनशील विषयावर भारतीय जनता पार्टीचे माजी प्रदेश सदस्य आणि समाजसेवक महेश काटकर यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, या पीडित कुटुंबांच्या हक्कासाठी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.**



राष्ट्रीय न्यास कायदा १९९९ नुसार, मतिमंद व्यक्ती १८ वर्षांची झाल्यानंतर त्यांच्या बँक खात्यांचे व्यवस्थापन, वैद्यकीय उपचार आणि मालमत्तेच्या कायदेशीर हक्कासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील स्थानिक स्तर समिती (एलएलसी) कडून कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्र मिळणे बंधनकारक असते. परंतु, धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात गेल्या तीन वर्षांपासून अनेक गरीब आणि गरजू पालकांचे अर्ज प्रलंबित पडले आहेत. यामुळे दिव्यांग व्यक्तींना सरकारी पेन्शन, आरोग्य सवलती आणि आर्थिक मदत मिळण्यात प्रचंड अडचणी येत आहेत.अनेक पीडित कुटुंबांनी आणि पालकांनी याविषयी समाजसेवक महेश काटकर यांच्याकडे धाव घेत आपल्या तक्रारी मांडल्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत काटकर यांनी प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवले आहे. (पान ४ वर)



## निहारीका कोळीचा संशयास्पद मृत्यू दोषींवर कठोर कारवाई करा; मागणी

**साक्री, दि.७ (प्रतिनिधी)- निहारीका कोळी हिच्या संशयास्पद मृत्यची निष्पक्ष व सखोल चौकशी करुन सत्य समोर आन दोषींवर कायदेशीर कारवाई करणे व कटुंबीयांना न्याय मिळवून देण्यात यावा अशी मागणी कोळी समाज बांधवांच्यावतीने नायब तहसीलदार किरण कोठावदे यांना निवेदन देऊन केली आहे.**

साक्री तालुक्यातील कोळी समाज (पान ४ वर)

## निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी पारदर्शकता आवश्यक- रघुवंशी

**धुळे, दि.७- देशातील लोकशाही व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी पारदर्शकता महत्वाची आहे. निवडणूक प्रक्रिया ही निष्पक्ष,पारदर्शक आणि विश्वासार्ह असणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे,अशी भूमिका काँग्रेस सेवादलाचे धुळे जिल्हाध्यक्ष आलोक रघुवंशी यांनी व्यक्त केली.**



पत्रकात नमुद केले आहे की, केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांना आणि शंकांना गांभीर्याने घेतले पाहिजे.निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि विश्वासार्हता अबाधित राहण्यासाठी आवश्यक पावले उचलली पाहिजेत. एसआयआर प्रक्रिया तात्काळ रद्द करावी. मतदार यादीच्या पुनरावलोकनाच्या प्रक्रियेमुळे पात्र मतदारांच्या मतदानाच्या अधिकारावर कोणताही परिणाम होऊ नये.मतदारांच्या मनात संभ्रम किंवा असुरक्षितता निर्माण करणारी प्रक्रिया थांबवून प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित केला पाहिजे. मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्यात याव्यात. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी मतपत्रिकेचा पर्याय स्वीकारावा, आदि मागण्यांचा समावेश आहे.

लोकशाहीमध्ये अंतिम सत्ता ही जनतेच्या (पान ४ वर)

## तिसरा बिबट्याही झाला जेरबंद

शिरपूर दि.७ (का.प्र.) : तालुक्यातील अर्थे व लगतच्या परिसरात दहशत माजवणारा तिसरा बिबट्याही सहा ऑक्टोबरला रात्री वनविभागाच्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. पूर्ण वाढ झालेली बिबट्याची मादी व तिची दोन पिले वनविभागाच्या ताब्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला तरी वनविभागाने सावध पवित्रा घेऊन शोधमोहीम सुरुच ठेवली आहे.

बोराडी वनक्षेत्रातील वासर्डी परिमंडळात अर्थे बु.शिवारात ९ सप्टेंबरला रात्री साडेसातला बिबट्याने दोन वर्षांच्या बालकाला जबड्यात धरून नेले होते. या घटनेनंतर बिबट्याला जेरबंद करण्याचे (पान ४ वर)

## शिरपूर तालुक्यात दोनशे तीस पाणंद रस्ते मंजूर दर्जेदार कामावर भर द्या- आ.अमरिशभाई पटेल




**शिरपूर, दि.७- मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची योजना आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी तसेच शेतमालाची वाहतूक सुलभ होण्यासाठी पाणंद रस्त्यांची आवश्यकता आहे. शिरपूर तालुक्यात या योजनेअंतर्गत तब्बल २३० पाणंद रस्ते मंजूर झाले असून, टप्प्याटप्प्याने या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. पाणंद रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार झाली पाहिजेत, यासाठी सर्व संबंधितांनी विशेष लक्ष द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शेतकरी बांधवांनीही विकासकामांसाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आ.अमरीशभाई पटेल यांनी केले.**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्यातील पहिल्या पाणंद रस्त्याचे भूमिपूजन बुधवार, दि.७ ऑक्टोबर (पान ४ वर)

## एस.सी.उपवर्गीकरण विरोधी जनआक्रोश मोर्चाचा एल्गार

नंदुरबार, दि.७(प्रतिनिधी)- एस.सी.उपवर्गीकरण विरोधी जनआक्रोश महामोर्चा संघर्ष समिति नंदुरबार चा वतीने उपवर्गीकरण विरोधी बैठक कपिलवस्तु बुद्ध विहार मध्ये रविवारी मोठ्या संख्येने उत्साहात यशस्वी संपन्न झाली. ही बैठक सामाजिक स्थरावर एस सी उपवर्गीकरण विरोधी जन आक्रोश महामोर्चा संघर्ष समिती तसेच विविध सामाजिक संघटनांच्यावतीने घेण्यात आली. उपवर्गीकरण विरोधात नियोजना संदर्भात बैठकीत सर्वानुमते निर्णय घेत २२ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता महाराणा प्रताप पुतळा येथून जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले. नंदुरबार शहरात शांततेत (पान २ वर)

## जिल्ह्यातून चाऱ्याची वाहतूक, विक्रीस सक्त मनाई- जिल्हाधिकारी डॉ.सेठी

**नंदुरबार दि.७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णयानुसार नंदुरबार जिल्ह्यातील सर्व सहा तालुक्यांमध्ये मट्रिगर-१(प्रथम कळ)फदुष्काळ घोषित करण्यात आला आहे. पर्जन्यमानातील कमतरतेमुळे जिल्ह्यात विविध मार्गांनी होणारे वैरणीचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. भविष्यात जिल्ह्यात चारा टंचाई निर्माण झाल्यास पशुधनाच्या उत्पादनक्षमतेवर तसेच त्यांच्या जीवितावर विपरीत परिणाम होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण होवून नये यासाठी नंदुरबार जिल्ह्याच्या महसुली हद्दीतून चाऱ्याची परजिल्हा व राज्याबाहेर वाहतूक आणि विक्री करण्यास सक्त मनाई केली आहे. असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिले आहेत.**

नंदुरबार जिल्ह्याच्या हद्दीतून इतर कोणत्याही जिल्ह्यात अथवा राज्याबाहेर सर्व प्रकारच्या सुक्या व ओला हिरवा चारा, कडबा, कोणत्याही प्रकारची कुट्टी, पेंढा, टीएमआर तसेच इतर पशुखाद्य वाहतूक व विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तथापि, (पान २ वर)

## वाहनाची दुचाकीला धडक एकाचा मृत्यू, एक जखमी

नंदुरबार,दि.७(प्रतिनिधी)- मोड ते बोरद मार्गावर वेवमोगरा माता मंदिराजवळ भरधाव चारचाकीने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात कुमार आर. रामय्या (वय ५१, रा. पोगतपट्टी, ता. पुदुकोट्टई, जि. पुदुकोट्टई, तामिळनाडू, हल्ली रा. कॉलेज रोड, लोणखेडा, ता. शहादा, जि. नंदुरबार) यांचा मृत्यू झाला. या अपघातात मोटारसायकल चालक जखमी झाला असून चारचाकी चालक अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झाला.

३ ऑक्टोबर २०२६ रोजी फिर्यादी व त्यांचा मित्र कुमार आर. रामय्या हे मोटारसायकल क्रमांक एम.एच-३९ (पान २ वर)

## विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे-पालकमंत्री रावल



**धुळे, दि.७- देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासूनच २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न पाहिले आहे. हे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी प्रत्येकाने आपले गाव, शहर, जिल्हा, राज्य आणि देशाच्या जडणघडणीसाठी यथार्थ योगदान द्यावे, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज येथे केले.**

सरकारप्रमुख म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज २५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त विकसित भारत संकल्प अभियानांतर्गत आज पंतप्रधान मोदी यांनी नवी दिल्लीत केलेल्या भाषणाच्या थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम सकाळी शहरातील मालेगाव रोडवरील आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या जनसंपर्क कार्यालयात झाला, त्यावेळी पालकमंत्री रावल बोलत होते. आ.अनुप अग्रवाल, धुळे ग्रामीणचे आ. राम भदाणे, माजी आ. राजवर्धन कदमबांडे, माजी आ.कुणाल पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, महापौर मायादेवी परदेशी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, जयश्री अहिरराव, कल्पना महाले, प्रतिभा चौधरी यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पक्षाचे धुळे महानगर व धुळे ग्रामीणचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रावल म्हणाले, की तब्बल २५ वर्षांपूर्वी म्हणजे ७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा गुजरातच्या मुख्यमंत्री पदाच्या स्वरूपात सरकारचे प्रमुख म्हणून राज्याची सूत्रे स्वीकारली. तेव्हापासून आजपर्यंत गुजरातचे सलग तीन वेळा मुख्यमंत्री आणि त्यानंतर २०१४ पासून आजअखेर देशाचे पंतप्रधान म्हणून ते धुरा वाहत आहेत. यामध्ये सुरवातीला गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याचा केलेला विकास सर्वांसाठी अनुकरणीय राहिला आहे. गुजरात मॉडेल म्हणून त्यांच्या विकासाची ओळख झाली. त्यानंतर गेली १२ वर्षे सलग तीन वेळा पंतप्रधान म्हणून काम (पान ४ वर)

## शस्त्राच्या धाक दाखवून परप्रांतीय तरुणांची लूट

धुळे, दि.७- इंस्टाग्राम या सोशल मीडियावरील फसव्या जाहिरातींना बळी पडून तालुक्यातील कुसुंबा ते अजनाळे दरम्यान दोन जणांची लुटमार केल्याची घटना घडली. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

औषधी पॅकिंगचे काम मिळवून आकर्षक पगार कमवा, या आशयाची जाहिरात काहींनी इंस्टाग्रामवर दिली. त्या जाहिरातीला बळी पडून विजयकुमार जगन पासवान (वय २१ राहणार वैशाली, बिहार) याच्यासह त्याचे नातेवाईक पवनकुमार रामलाल पासवान, मित्र अंकीतकुमार (पान २ वर)

## शहाद्यात महाविकास आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक नंदुरबारला आज मते वाचवा, देश वाचवा मोर्चा

**शहादा,दि.७ (का.प्र.)- दि. ८ ऑक्टोबर रोजी नंदुरबार येथे एसआयआर प्रक्रियेच्या चुकीच्या धोरणाविरोधात आणि ज्ञानेशकुमार यांच्या निषेधार्थ मते वाचवा, देश वाचवा या प्रमुख मुद्द्यावर भव्य मोर्चा काढण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या नियोजनासाठी महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांच्या प्रमुख व कार्यकर्त्यांची एक महत्त्वाची बैठक शहाद्यातील एस. कुमार लॉन येथे पार पडली.**



या बैठकीत महाविकास आघाडीमधील विविध पक्षांचे प्रमुख नेते व पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात काँग्रेस पक्षाकडून ज्येष्ठ माजी मंत्री पद्माकर वळवी, जिल्हाध्यक्ष दीपक पटेल, जिल्हा काँग्रेसचे विक्रम पाडवी, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुहास नाईक, यशवंत चौधरी, रियाज कुरेशी, ओंकार पटले यांच्यासह जिल्ह्यातील अनेक काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले होते. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस (पान २ वर)

## हस्ती बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त हाडांची ठिसूळता तपासणी शिबीर

**धुळे, दि.७- शहरातील ग.नं.५ नगरपट्टी कॉर्नर येथील हस्ती बँकेच्या २९ वर्धापन दिनानिमित्त दि.९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या कालावधीत रक्तदान शिबीर तसेच मोफत हाडांची ठिसुळता तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.**

शिबीरात हाडांचे तज्ञ डॉ. यश महेश मुथा तपासणी करणार आहेत. ग्राहक जागरूकता कार्यक्रमांतर्गत ॲड.चैतन्य भंडारी तसेच कृत्रिम बुध्दीमत्ता या विषयावर अथर्व बिरारी मार्गदर्शन करणार आहेत. शहरातील शाखेने ग्राहक सेवेची अखंड अठ्ठावीस वर्षे पूर्ण करून एकोणतीसाव्या वर्षात पदार्पण करत आहे. प्रतिज्ञा आमची..प्रगती तुमची हे ब्रीदवाक्य असलेल्या हस्ती बँकेच्या वर्धापनदिनाच्या सोहळ्याप्रसंगी (पान २ वर)



## टंचाई दूर करण्यासाठी अक्कलपाड्याचे पाणी शेतातील चारापिकांना मिळावे-कुणाल पाटील

**धुळे, दि.७- दुष्काळाची भीषण दाहकता आहे. खरीपाची पिके पूर्णपणे वाया गेल्याने शेतकरी तसेच पशुपालक शेतकरी संकटात सापडला आहे. धुळे तालुक्यासह जिल्ह्यात आतापासूनच पशुपालक शेतकऱ्यांची चाऱ्यासाठी वणवण सुरु झाली आहे. त्यामुळे चारा टंचाई दूर करण्यासाठी अक्कलपाडा धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामात गुरांसाठी घेतल्या जाणाऱ्या चारा पिकांना पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी मा.आ. कुणाल पाटील यांनी जिल्ह्याचे पालकमंत्र्यांकडे करणार असून धुळे जिल्हाधिकाऱ्यांकडेही याबाबत मागणी करण्यात आली आहे. दरम्यान अक्कलपाडा प्रकल्पांतर्गत कालव्यातील सर्व गेटसची दुरुस्ती करण्याची मागणी मा.आ.कुणाल पाटील यांनी केली आहे.**

अक्कलपाडा निम्न पांझरा प्रकल्पातून प्रस्तावित ऑक्टोबर २०२६ या महिन्यातील आकस्मित पाणी आरक्षण समितीच्या बैठकीत रब्बी हंगाम सन २०२६ करीता लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना गुरांसाठी घेतल्या (पान ४ वर)

## मनपात शहरातील पथविक्रेत्यांसाठी लोक कल्याण मेळाव्याचे आयोजन

**धुळे, दि.७- धुळे महानगरपालिकेतर्फे पीएम स्वनिधी योजनेतील लाभार्थी तसेच शहरातील पथविक्रेत्यांसाठी दि.८ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत मनपा सभागृहात लोक कल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

पीएम स्वनिधी योजनेच्या माध्यमातून शहरातील पथविक्रेत्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी दि. १ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात मनपा आयुक्त नितीन कापडणीस तसेच अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे उपस्थित राहून पथविक्रेत्यांना मार्गदर्शन करणार आहेत. (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,37,100 रु.+3% GST
सोने- 24 K -1,49,000 रु.+3% GST
चांदी- 2,27,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात जलस्त्रोत अधिक पण.....?

मान्सून न बरसताच यावर्षी माघार घेत आहे.गेल्या वर्षी राजस्थानातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झालेला असतांनाच महाराष्ट्रातून त्याची माघार नंदुरबार पासून झाली होती त्यामुळे अखेरच्या पावसाने उत्तर महाराष्ट्र ओलाचिंब झाला होता. इतका की नको नको रे पावसा असा धिंगाणा अवेळी,घर माझे चंद्रमौळी, अन दारात सायली असे म्हणण्याची पाळी आली होती. त्या काळात पडलेल्या पावसाने सरासरी ओलांडल्या मुळे दोन्वर्षे पाऊस नाही पडला तरी चालेल असा सूर आपल्याकडे उमटला होता.मात्र यंदाच्या अवर्षणामुळे सर्वांच्याच तोंडचे पाणी पळाले आहे.जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी येत्या १६ तारखेपासून राज्यात दहा टक्के पाणी कपात केली जाणार असल्याचे जाहीर केले.पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये म्हणून हा निर्णय घेत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.ही तर फक्त चुणुक आहे.पुढे काय होणार त्याची ही झलक आहे.राज्यातील निम्मे भागातून मान्सून परतला असल्याचे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे पुढच्या दोन तीन दिवसात विदर्भ, मराठवाडा,मध्य महाराष्ट्रातील काही भाग छत्तीसगड,तेलंगणा, आणि कर्नाटकचा काही भाग पाऊस परतण्याच्या टापूत असेल.बारामतीला परभणीतून तो पोहचेल आणि हर्णे बंदरातून लुप्त होईल.याचा अर्थ असा की,खान्देशच्या वाट्याला काहीच येणार नाही.एक तर आधीच सरासरीच्या खूप कमी पाऊस झाला त्यामुळे खरिपाची पिके हातची गेली.रब्बीसाठी देखील अनुकूल परिस्थिती दिसत नाही अशा वेळी पुढच्या जुलै महिन्या पर्यंत म्हणजे तब्बल नऊ महिने जो साठा आपल्या हातात आहे त्याचा वापर फार जबाबदारीने करावा लागेल.परतीचा पाऊस कोल्हापूर जिल्ह्यातल्या काही भागात धो धो कोसळला असल्याच्या बातम्या आलेल्या आहेत.इतर ठिकाणची खबरबात नाही.असे असले तरी यंदा जगातील सर्वाधिक पाऊस ज्या चेरापुंजीला मेघालयात पडतो त्याही पेक्षा अधिक पावसाची नोंद पश्चिम घाटातील भिरा येथे झाल्याची नोंद मिळते.भिरा हे केंद्र रायगड जिल्ह्यात येते.येथे ९८३३ मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याचे शासनाचे आकडे आहेत.त्या खालोखाल पश्चिम घाटातील आणखी दोन केंद्रावर मोठा पाऊस झाल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे.गेल्या काही वर्षांपासून ईशान्य भारतातील पावसाचे प्रमाण कमी झाले असून पश्चिम घाटात मात्र तो मोठ्या प्रमाणावर पडत आहे.पुणे जिल्ह्यातील ताम्हिणी येथे जेवढा पाऊस पडला त्यापेक्षा सुमारे वीस टक्के पाऊस चेरापुंजीमधे कमी पडल्याचे चित्र आहे

बंगालच्या समुद्रात कमी दाबाचे पट्टे निर्माण झाले म्हणजे ते वारे पश्चिम घाटाकडे गेल्या काही वर्षांपासून वळू लागले आहेत.त्यांचा मार्ग बदललेला दिसतो.त्या पार्श्वभूमीवर आपल्या कडील जलस्त्रोत, वातावरणातील बदल, आणि पाणी वापराचे नियोजन यावर कार्यशाळा घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. विभाजनाच्या प्रक्रियेतून, राजकारणाच्या शहप्रतिशहातून,विधान परिषदेच्या निवडणुकीतील डावपेचातून आणि कुरघोडीतून वेळ काढून पाण्याच्या नियोजन आणि वापराकडे लक्ष द्यावे लागेल.यंदा राजस्थानात,तेलंगणात व झारखंड मध्ये पाण्याच्या उपलब्धतेत मोठी घट निर्माण झाली आहे.देशभरातील दुसऱ्या गणनेतून उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार या स्थितीचे दर्शन झाले आहे . पहिल्या जलस्त्रोत गणनेनंतर दुसऱ्या गणनेची माहिती नुकतीच समोर आली आहे.त्यात महाराष्ट्रात ४ लाख ७४ हजार जल स्त्रोत असल्याची नोंद झाल्याचे आकडे समोर आले आहेत.पहिल्या जलस्त्रोत गणनेच्या तुलनेत हे आकडे पाच पटीने वाढलेले दिसतात.म्हणजे इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र आघाडीवर दिसतो.राजस्थान,तेलंगणा,मिझोरम, झारखंड,अरूणाचल प्रदेश मधील जलसंपदा मात्र घटत असल्याचे दिसत आहे.देशात वेगवेगळ्या पध्दतीच्या गणना होत असतात.टोपोलॉजिकल सर्व्हे,जनावरे,वाघ,सिंह,जंगले याच प्रमाणे जलसंपदा किती आहे त्यावरचा ही सर्व्हे होत असतो.यात ईशान्य भारतातील पावसाच्या प्रमाणामुळे जलस्त्रोत निर्माण करण्याची गरज आता पर्यंत भासली नसावी त्याचाच परिणाम म्हणून या राज्यातील जलस्त्रोत घटल्याचे दिसते.पहिली जलस्त्रोत गणना २०१७–१८ या वर्षात झाली होती.गेल्या वर्षी दुसऱ्या जलस्त्रोत गणनेला सुरुवात झाली होती.यात शहरी आणि ग्रामीण,शासनाची आणि मालकी हक्काची अशी वर्गवारी करण्यात आली होती.त्याचे प्रकार किती आहेत,अवस्था काय आहे त्यांची क्षमता किती आहे यासंबंधीचा विचार झाला होता. त्यात महाराष्ट्र अव्वल असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्रात ग्रामीण भागात राज्यातील एकूण जल स्तोत्रंपैकी ६२ टक्के एवढे तलाव आहेत. त्यापैकी ९८ टक्के पाण्याचा वापर शेतीसाठी आणि तेथील पूरक उद्योगांसाठी केला जातो. त्या तुलनेत बाकीची राज्ये मागे असल्याचे चित्र आहे

महाराष्ट्रात राजकारण जरी टोकाला पोहोचले असले तरी पायाभूत व्यवस्था आणि सुविधा याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. त्याचाच परिणाम म्हणून जलस्त्रोत वाढलेले दिसतात. नाला बंडिंग, पाझर तलाव, लघु पाटबंधारे, मध्यम प्रकल्प, जलविद्युत प्रकल्पांसाठी बांधलेले बंधारे, कोल्हापूर टाईप बंधारे, भूमिगत बंधारे, तापी सारख्या नद्यांवर बॅरेजेस, आणि छोट्या मोठ्या नद्यांवर मध्यम प्रकल्प, अशी महाराष्ट्रातील जलस्त्रोतांची रचना आहे. त्यात आता महाराष्ट्र सरकार नदीजोड प्रकल्पाचा विचार युद्ध पातळीवर करीत असून. पैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्प, नारपार नदी जोड प्रकल्प अशा काही योजनांचा त्यात समावेश आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला सरदार सरोवराचे जे पाणी आलेले आहे आणि तापी नदीवरील उकाई धरणात असलेल्या पाण्याचा जो महाराष्ट्राचा वाटा आहे तो उचलून तापीला आणि नर्मदेला मिळणाऱ्या उपनद्यांमध्ये ते सोडणे आणि काही उपसा सिंचन योजना निर्माण करणे यातूनही भविष्यकाळात जलस्त्रोतांची संख्या वाढणार आहे. सरदार सरोवरातील ११ टीएमसी पाणी सातपुड्यात बोगदा करून जर डोंगरातून निघणाऱ्या आदिवासी भागातील नद्यांमध्ये सोडले तर या नद्या बारमाही वाहतील. अशी योजना काही वर्षांपूर्वी पी.के.अण्णा पाटील यांनी ते आमदार असताना सादर केली होती आणि जल आयोगाने ती तत्वत: मान्य केली होती. आता महाराष्ट्र सरकार ज्या योजनांचे सूतोवाच करते ती योजना या आधीच मोठ्या प्रमाणावर चर्चिली गेलेली आहे. उकाई डॅम चे पाणी गेल्या अनेक वर्षांपासून वाटाघाटी विना पडून होते. त्यासंबंधीची चर्चा मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र सरकार दरम्यान शिवाजीराव पाटील निलंगेकर मुख्यमंत्री असतानाच झालेली होती.तेव्हापासून या योजनांचे भिजत घोंगडे पडलेले होते. आता महाराष्ट्र सरकार त्या योजनांविषयी बोलत असले तरी त्या केव्हा आकार घेतील यासंबंधीची निश्चित अशी माहिती मिळत नाही. फक्त चर्चा तेवढ्या चालू आहेत. यंदा तर अवर्षणामुळे पिण्याच्या पाण्याची अवस्था फार वाईट होणार आहे. अक्कलपाडा धरणात असलेला साठा शेतीसाठी आवर्तने सोडून जर वापरला तर पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण होईल. जरी प्रकाशे, सारंगखेडे, सुलवाडे, अमळनेर व भुसावळ तालुक्यात बॅरेजेस झालेले असले तरी त्यातील पाण्याचा वापर निरनिराळ्या गावांना करतानाच धुळे आणि दोंडाईचा नंदुरबार शहादा, तळोदा, शिरपूर, भुसावळ, जळगाव, चोपडा अमळनेर रावेर या शहरांना देखील पुढच्या उन्हाळ्यापर्यंत आणि त्यानंतरच्या दोन महिन्यांपर्यंत पुरवठा करावा लागणार आहे. म्हणजेच जलसाक्षरतेचा वापर पुन्हा करावा लागेल आणि लोकांना पाण्याची नासाडी करू नये असे सांगावे लागेल. ज्यांच्याकडे शेतात पाणी आहे त्यांची पिके काही अंशी वाचतील. परंतु त्यांच्या शेतातील विहिरी अधिग्रहीत करून टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची वेळ येणार आहे. अशाप्रकारे देशातील इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील जलस्त्रोत वाढलेले असले तरी त्यातील पाण्याच्या उपलब्ध विषयी प्रश्नचिन्ह असणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या जलस्त्रोतांकडे बघावे लागेल. आगामी काळात अनुत्पादक कामांपेक्षा उत्पादक कामांवर भर द्यावा लागेल त्यात जलस्त्रोत अजून निर्माण करण्याची योजना असावी. त्याशिवाय दुसऱ्या कुठल्याही कामांवर खर्च होऊ नये. जलस्त्रोत तयार करणे ही काळाची गरज ओळखून शासनासह स्वयंसेवी संस्थांनी या कामे पुढाकार घेतला पाहिजे.

## एसआरपीएफ जवानाचा सर्पदंशाने मृत्यू

**धुळे, दि.७- राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक सहा (धुळे) मधील जवानाचा गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहिमेसाठी तैनात असताना सर्पदंशाने निधन झाले. पार्थिव धुळे येथे आणल्यानंतर देवपुरातील श्री एकवीरा देवी अमरधाम येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.**

राहुल प्रभाकर शिनगारे (वय ३७, रा. सप्तश्रृंगी नगर, देवपूर स्टेडीयमजवळ, धुळे) असे जवानाचे नाव आहे. गडचिरोली जिल्ह्यात दीड महिन्यांपुर्वी बंदोबस्तासाठी नियुक्ती होती. तेथील रेगडी पोलीस मदत केंद्र परिसरात जवानांच्या निवास व्यवस्था होती. काल सकाळी सातच्या सुमारास राहुल शिनगारे अंघोळीसाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्या हाताला विषारी सर्पाने दंश केला. त्यांनी कॅम्पकडे धाव घेतली, त्यांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव धुळ्यात आणले. आज सकाळी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. जवान राहुल शिंगारे यांच्या मृत्यूने हळहळ व्यक्त होत आहे.

## नंदुरबार शहरातील स्ट्रीट लाईटची मागणी

नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी)- नंदुरबार शहरात येणाऱ्या प्रमुख रस्त्यांवर शहराच्या हद्दीपासून शहरापर्यंत डिव्हायडर व स्ट्रीट लाईटची सुविधा करण्यात यावी, अशी मागणी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी जिल्हाधिकारी मित्ताली शेठी यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आमदार रघुवंशी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात २५ सप्टेंबर रोजी पत्र दिले आहे. नंदुरबार शहरातील प्रमुख रस्त्यांची कामे विविध यंत्रणांमार्फत सुरू आहेत. या सर्व संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात संयुक्त बैठक आयोजित करून रस्त्यांच्या कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दोंडाईचा-नंदुरबार, नंदुरबार-धानोरा, शेवाळी फाटा-नंदुरबार, विसरवाडी-नंदुरबार, तळोदा-नंदुरबार तसेच कोळदा-नंदुरबार या प्रमुख रस्त्यांवर शहराच्या हद्दीपासून शहरापर्यंत डिव्हायडर व स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी पत्रात करण्यात आली आहे.

संबंधित रस्त्यांच्या अंदाजपत्रकात डिव्हायडर व स्ट्रीट लाईटचा समावेश आहे किंवा नाही, याची माहिती घेऊन समावेश नसल्यास आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी सामाईक प्रयतक करावेत, असेही आमदार रघुवंशी यांनी म्हटले आहे.

नंदुरबार हे जिल्ह्याचे मुख्यालय असून प्रमुख मार्गांवर डिव्हायडर व स्ट्रीट लाईटची सुविधा झाल्यास शहराच्या सुरक्षिततेबरोबरच शहराच्या सौंदर्यातही भर पडेल, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. याबाबत आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकीस आपणासही आमंत्रित करावे, अशी विनंती त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

✽ धुळे दि.७- तापी पाणीपुरवठा योजनेचे वेळापत्रक विस्कळीत झाले आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्यावेळा अनिश्चित झाल्या आहेत. परिणामी नागरिक पाणी पुरवठ्याच्या विषयावर तीव्र नाराज आहेत. तापी योजनेवर आधारीत असलेल्या प्रभाग क्र.१ आणि २ मधील नागरी वसाहतीमध्ये काही आठवड्यांपासून पाणी पुरवठ्याच्या वेळा अनिश्चित झाल्या आहेत. मनपाने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली ात आहे

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## धडगाव तालुका परिसरातून पकडला एक कोटी एकतीस लाखांचा गांजा

**नंदुरबार दि. ७ (प्रतिनिधी) : आगामी सण व उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू वाहतूक, साठा, अवैध शस्त्रे तसेच अंमली पदार्थांची लागवड व विक्रीविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**

या अनुषंगाने ६ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार धडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मांडवी गावाच्या शेतशिवारातील रुणमालपाडा परिसरात कारवाई करण्यात आली. वनपट्ट्यात पाहणी केली असता गांजाची लागवड केलेली आढळून आली.

पोलिसांनी कारवाई करून २६२ किलो वजनाची गांजाची झाडे जप्त केली. या गांजाची किंमत १ कोटी ३१ लाख १५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. मांडवी बु. येथील रुणमालपाडा रहिवासी पिंटू ऊर्फ पिंट्या मिठ्या पटले याने वनजमिनीमध्ये बेकायदेशीररीत्या गांजाची लागवड करून त्याची जोपासना केल्याचे पोलिसांच्या तपासात आढळून आले.

याप्रकरणी पिंटू ऊर्फ पिंट्या मिठ्या पटले याच्याविरुद्ध धडगाव पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त गांजाची झाडे पुढील कायदेशीर कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, विकास गुंजाळ, महेश निकम तसेच पोलीस हवालदार दिनेश चित्ते, स्वप्नील गोसावी, मुकेश तावडे, सुनील येलवे, सचिन वसावे आणि पोलीस अंमलदार मनोज महाजन, अभय राजपूत, निशीगंध गवळे, हेमंत बारी, विनोद पाटील, राहुल पांढारकर यांच्या पथकाने केली.

## नागरीकांना मृत्यूचे दाखले घरपोहच दु:खात हेलपाटे नको- ललीत माळी

धुळे, दि.७- घरातील एखाद्या व्यक्तीचे निधन होणे ही त्या कुटुंबासाठी अत्यंत दुःखद आणि भावनिक वेळ असते. अशा वेळी कुटुंबातील सदस्यांना मृत्यू दाखला मिळविण्यासाठी महानगरपालिकेच्या कार्यालयात जाऊन कागदपत्रांची पूर्तता, चौकशी आणि दाखला घेण्यासाठी पुन्हा-पुन्हा हेलपाटे मारावे लागू नयेत. यासाठी महानगरपालिकेच्या विविध नागरी सुविधा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी प्रभाग क्र. १ चे नगरसेवक ललित गंगाधर माळी यांनी एक संवेदनशील आणि माणुसकी जपणारा उपक्रम सुरू केला आहे. जानेवारी २०२६ पासून प्रभाग क्रमांक १ मध्ये मृत्यू दाखला घरपोच देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. जानेवारीपासून आतापर्यंत १३२ कुटुंबांना मृत्यू दाखला घरपोच देण्यात आला आहे, तर आणखी ९० कुटुंबांना लवकरच मृत्यू दाखला घरपोच देण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत संबंधित कुटुंबाची आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृत्यू दाखला थेट त्यांच्या घरापर्यंत पोहोचविला जात आहे. विशेष म्हणजे नुकताच श्रीकृष्ण मंदिराचे संत साळकर बाबा यांच्या निधनानंतर त्यांचा मृत्यू दाखला त्यांच्या कुटुंबीयांना घरपोच देण्यात आला. या प्रसंगाचा उल्लेख करताना ललित माळी यांनी सांगितले की, कुटुंबातील व्यक्ती गमावल्याचे दुःख मोठे असते. त्या दुःखाच्या काळात प्रशासनाच्या कार्यालयात जाऊन दाखल्यासाठी धावपळ करावी लागू नये, एवढी छोटीशी मदत जरी करता आली तरी ती लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी आहे. मृत्यूची वेदना आपण कमी करू शकत नाही; मात्र त्या दुःखाच्या काळात कुटुंबीयांना होणारी प्रशासकीय धावपळ नक्कीच कमी करू शकतो. नागरिकांच्या अडचणीच्या वेळी त्यांच्या दारात पोहोचणे आणि त्यांना शक्य ती मदत करणे, हीच माझ्यासाठी खरी जनसेवा आहे, असे नगरसेवक ललित माळी यांनी सांगितले.

## महिला महाविद्यालयाच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

नंदुरबार, दि.७(प्रतिनिधी)- जी. टी. पाटील महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धेत महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करत पाच क्रीडा प्रकारांत यश संपादन केले. गोळाफेकमध्ये द्वितीय, १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय, ५ हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय, १०० मीटर रिले स्पर्धेत तृतीय, तर १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

यापूर्वी शहादा येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धेतही महिला महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला होता. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना क्रीडा विभागातील प्रा. सुमित्रा मुंढे, प्रा. रिनेश पावरा आणि प्रा. बी. एफ. चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनींचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सुनील कुवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिमखाना प्रमुख प्रा. डी. एल. टाकोळे, प्रा. डॉ. मधुकर देसले, प्रा. डॉ. जैदी, प्रा. राजकुमार पाटील, प्रा. रिनेश पावरा, प्रा. सुमित्रा मुंढे, प्रा. बी. एफ. चव्हाण आदी उपस्थित होते.

### पान १ वरुन

## एस.सी.उपवर्गीकरण विरोधी जनआक्रोश मोर्चाचा एल्गार

कायदासुव्यवस्था राखत विविध घोषणा देत शिस्तीने मोर्चा काढण्यात येणार आहे. जनआक्रोश महामोर्चा करिता सर्वांनी तन मन धनाने सहभाग नोंदवुन नंदुरबार जिल्ह्यातील सामाजिक राजकीय संघटनेने उत्स्फूर्त प्रतिसाद देउन आरक्षणाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि संविधानिक मूल्यांच्या सन्मानासाठी, जनआक्रोश महामोर्चात हजारोंचा संख्येने सहभागी व्हा असे आवाहन उपवर्गीकरण विरोधी जनआक्रोश महामोर्चा संघर्ष समिति नंदुरबार व विविध सामाजिक संघटना यांनी केले आहे.

## जिल्ह्यातून चाऱ्याची वाहतूक, विक्रीस

शासकीय योजना, पशुसंवर्धन विभाग किंवा जिल्हा प्रशासनाने अधिकृत मंजुरी दिलेल्या चारा वाहतुकीस हा आदेश लागू राहणार नाही. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. हा आदेश जारी दिनांकापासून पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत लागू राहणार आहे. जिल्ह्यातील पशुधनासाठी उपलब्ध चारा सुरक्षित राहावा आणि संभाव्य चारा टंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी संबंधितांनी या आदेशाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## वाहनाची दुचाकीला धडक एकाचा मृत्यू, एक जखमी

ए एफ -८०७४ वरून मोड येथे भांडे विक्रीचे पैसे घेण्यासाठी गेले होते. पैसे घेऊन मोडकडून बोरदकडे जात असताना मोड शिवारातील वेवमोगरा माता मंदिराजवळ समोरून आलेल्या चारचाकीने भरधाव वेगात मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात कुमार आर. रामाराज यांचा मृत्यू झाला, तर फिर्यादी जखमी झाला. अपघातानंतर चारचाकी चालकाने जखमींना मदत न करता वाहनासह पळ काढला. याप्रकरणी तळोदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## शहाद्यात महाविकास आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक

पक्षाकडून जिल्हाध्यक्ष एन.डी. पाटील, प्रदेश कमिटी सचिव शांतीलाल साळी, महिला अध्यक्ष कविता सोलंकी, रेश्मा पवार आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यासोबतच बैठकीत डाव्या पक्षांच्या वतीने कॉम्रेड सुनील गायकवाड, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून जिल्हाध्यक्ष राजेश्वर सामुद्रे, किरण सोनवणे व भवन शेवाळे यांनीही सहभाग नोंदवला. याशिवाय विविध आजी-माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, विविध सेलचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत आगामी मोर्च्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध विषयांवर चर्चा करून जबाबदाऱ्या वाटप करण्यात आल्या.

## हस्ती बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त

चेअरमन कैलास जैन, मदनलाल जैन, व्हा.चेअरमन संजय दुगड, मुख्य कार्यकारी अधिकारी सतिष जैन यांच्यासह शरद पसारी, मनिष उपाध्ये, संदेश डुंगरवाल, विनोद भन्साली, जयेश संचेती, ललित बरडिया, कपिल तनेजा, शाखा व्यवस्थापक किर्ती पाटील उपस्थित राहणार आहेत. शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## शस्त्राच्या धाक दाखवून परप्रांतीय तरुणांची लूट

प्रमोद पासवान मंगळवारी सकाळी अजनाळे शिवारात आले. संबंधितांनी त्यांना विश्वासात घेत अजनाळे ते कुसुंबा परिसरातील निर्जन स्थळी नेले तेथे त्यांना पिस्तूल, चाकू, लोखंडी रॉडची धमकी दाखवत मारहाण केली. त्यांच्याकडील काही रोकड हिसकावून घेतली, तसेच फोन पे वरही पैसे वर्ग करण्यास भाग पाडले. याप्रकरणी संशयित पवन भोसले पवार, इशांत सुभाष पवार, रवि उर्फ रव्या फोपा भोसले, आदित्य साहेब भोसले, गोरख किरसिंग भोसले (सर्व रा. अजनाळे) अन्य सहा ते सात संशयितांविरुद्ध ता. जि. धुळे यांनी व त्यांचे इतर ६ ते ७ अज्ञात आणि विरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### पैसे दुपटीचे अमीष

नागपूर येथील मजूर दत्तात्रय अशोक शिंदे या सोशल मीडियावर जाहिरातीला बळी पडून तेथे आला होता. पैसे डबल करून देण्याचे आमिष त्याला काहींनी दाखवले होते. दत्तात्रय शिंदे यालाही शिवीगाळ दमदाटी करून मारहाण करण्यात आली. त्याच्याकडून ९१ हजार ५०० रुपयांची रोकडही लुटली. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक रवी कुमार पवार तपास करीत आहेत.

## शब्दकोडे क्रमांक.२४६८



**आडवे शब्द :** १.समुद्र ३.वालाच्या शेंगा ५.फॅक्टरी ८.धुळीचे उठलेले वादळ १०.हिंदीत-जाळे ११.चांगले १२.उपवासाला फराळासाठी वापरला जाणारा तांदुळ १३.वांती १७.देखरेख,पहारा १८.पाठोपाठ २०.मागोमाग २२.रक्त २३.चुकीचा ,एक चवदार मासा २५.जोम,माज २६.लग्नाच्या मांडवासाठी उभारलेले बांबू २८.कौतुक ३०.वजनदार ३१.कागद बनवण्यासाठी लाकडाचा अत्यंत बारीक केलेला गोळा ३३.ओझरते दर्शन ३५.लाकडाचे गोदाम ३७.वर्तुळ ४०.जागर ४२.ओसाड ४४.हेमंत बिर्जेचा एक भयपट ४६.एक प्रकारचे विदेशी मदय ४७.माकड ४८.पाठलाग ४९.मोहरा सिनेमातील नटी फक्त नाव ५०.केशव,राघव ५२.प्राण्यांची प्रजात ५२.शपथ ५३.ग्रामीण बोलीत रक्त **उभे शब्द :** १.जपणूक २.दाणेदार सांजा ३.विहीरीचे पाणी शेतात जाण्यासाठी केलेला रस्ता ४.गांडूळाची हालचाल ५.समय ६.विशेष ७.सगेसोयरे ९.वड १०.हिंदीत-जीव १४.हेतु १५.पाठलाग १६.कठीण १७.मुखोदगत १९.मुददा,बाब २१.वेडयांचे इस्पितळ २४.वाघोबाची मावशी २६.धड आणि हात यांना जोडणारा सांदा २७.रस्सा २९.शाहरूख खान,जूही चावला,सनी देओल यांचा एक सिनेमा ३२.फळाच्या आतील मगज ३४.मनाचा ओढा ३६.पाण्याने भरलेला माठ ३८.मुसलमान ३९.निर्विकार ४१.लीन ४३.एक गोड पेय ४४.आकाशात उडणारे एक दळण वळणाचे साधन ४५.काव्य ४७.वास

**शब्दकोडे क्रमांक : २४६७ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | रो | ग्य | ■ | घा | ब | र | ट | ■ | वा | द | ळ |
| ठ | ग | ■ | मा | त | ■ | का | ■ | सा | स | र | ■ |
| ■ | ट | पा | ल | ■ | म | ना | ई | ■ | ना | ■ | मा |
| आ | ■ | क | व | ड | सा | ■ | म | ग | ■ | थो | र |
| यु | ग | ■ | ण | ■ | ला | ड | ली | ■ | जा | ■ | हा |
| ध | र | ण | ■ | ला | डो | बा | ■ | आ | म | र | ण |
| ■ | ज | ■ | ज | ल | सा | ■ | भा | ■ | न | ड | ■ |
| चिं | ■ | आ | र | सा | ■ | अं | त | रं | ग | ■ | स |
| ता | डी | ■ | ब | ■ | धं | दा | ■ | ग | र | द | न |
| ज | ■ | सा | ■ | मी | ■ | ज | मा | त | ■ | र | द |
| न | र | ब | ळी | ■ | शी | ■ | न | ■ | बा | बा | ■ |
| क | ■ | ण | ■ | टी | ■ | वि | स | र | ■ | न | स |

## महिलेवर अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा आ.अग्रवालांसह सकल चर्मकार समाजाची मागणी

धुळे, दि.६- शहरातील आझाद नगर पोलीस स्टेशन हद्दीत महिलेवर तीघांनी अत्याचार केला. या घटनेतील तीन्ही संशयितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. या मागणीचे निवेदन शहराचे आ.अनुप अग्रवाल यांच्यासह सकल चर्मकार समाज बांधवांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांसह जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

निवेदन देतांना आ. अनुप अग्रवाल, काँग्रेसचे युवराज करनकाळ, सकल चर्मकार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात नमुद केले आहे की, पिडीत महिला अनुसुचित जाती घटकातील असल्याने समाजात संतापाची लाट पसरली आहे. या घटनेचा खटला जलद गती न्यायालयात चालवावा, सखोल चौकशी करण्यात यावी, पिडीतेच्या कुटूंबीयांना संरक्षण देण्यात यावे. निवेदन देतांना सकल चर्मकार समाजाचे दीपक अनुष्ठान, भिवसन अहिरे, माधव ठाकरे, पवन अहिरे, दीलीप समशेर, हरीचंद्र लोंढे, पंडीत गोस्वामी, संतोष अहिरे, राजु अहिरे, नंदीनी सौंदाणकर, इंजि.रवी पवार, चंद्रकांत अहिरे, सुरेश चत्रे, डॉ.जयश्री वानखेडकर, किरण अहिरे, पारिजात चव्हाण, राकेश सुर्यवंशी यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.





प्रकाश में आज– गर्व




सलमान खान शिल्पा शेट्टी अरबाजखान धमरिश पुरी मुकेश रूषी अनुपम खेर




## मनपाची पथनाट्याद्वारे व्यसनमुक्ती जनजागृती

धुळे, दि.१७- महानगरपालिका मुख्यालय प्रांगण, साक्री रोड येथे व्यसनमुक्तीचा संदेश देणारा प्रबोधनात्मक उपक्रम सेवा संकल्प अभियानानिमित्त उत्साहात पार पडला. जोगी परिवार यलम्मा माता मंदिर संस्थेच्या वतीने व्यसनमुक्ती हीच खरी प्रगती या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले.

या पथनाट्याद्वारे तंबाखू, मद्यपान आणि अमली पदार्थांच्या सेवनामुळे कुटुंबाची होणारी वाताहात तसेच आरोग्यावर होणारे घातक दुष्परिणाम अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आले.

# स्व-संरक्षणासाठी नवापूरच्या विद्यार्थिनी सज्ज
# लाठी-काठी स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा शुभारंभ

**नवापूर, दि.७- विद्यार्थिनींमध्ये स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण करण्यासोबतच त्यांना मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने दि. नवापूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने संस्थेतील सर्व शाळांमधील विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय लाठी-काठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. नवापूर पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक अश्विनी सानप यांच्या हस्ते या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.**

यावेळी व्यासपीठावर नवापूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विपीनभाई चोखावाला, उपाध्यक्ष शिरीषभाई शाह, सचिव राजेंद्रभाई अग्रवाल, सहसचिव शोएबभाई मांदा, सदस्य परागभाई ठक्कर, अर्चनाबेन शाह, लाठी-काठी प्रशिक्षक दि किसान स्पोर्ट्स व करियर अकॅडेमी चे संचालक प्रा. मिलिंद ठोके, उद्घाटक तथा नवापूर पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक अश्विनी सानप, नवापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. मयूर पाटील, शाळेचे प्राचार्य डॉ. गणेश महाजन यांच्यासह सार्वजनिक मराठी हायस्कूलचे प्राचार्य मिलिंद वाघ, श्रीमती एस.एम. चोखावाला लिटिल एंजल्स अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. सिमरन दिवटे, सार्वजनिक मराठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक महेश पाटील, गुजराती प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश प्रजापत, गुजराती पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका एकताबेन देसाई, उर्दू पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका शायजा पठाण, सार्वजनिक गुजराती हायस्कूलच्या उपमुख्याध्यापिका निर्जलाबेन सोनवणे, उपप्राचार्य नरेंद्र पाटील, पर्यवेक्षक दीपक मंडलिक, जाहीद खान पठाण, उमेशकुमार राणा आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला उद्घाटक पोलीस उपनिरीक्षक अश्विनी सानप व मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि माता सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

प्रास्ताविकातून शाळेचे प्राचार्य डॉ. गणेश महाजन यांनी बदलत्या सामाजिक परिस्थितीत विद्यार्थिनींनी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे, तर मानसिक व शारीरिकदृष्ट्याही सक्षम असणे आवश्यक असल्याचे सांगितले. याच विचारातून लाठी-काठी स्वसंरक्षण प्रशिक्षणाची संकल्पना पुढे आली असून, विद्यार्थिनींना आत्मविश्वासाने व निर्भयपणे समाजात वावरता यावे, हा या उपक्रमामागील संस्थेचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लाठी-काठी प्रशिक्षक प्रा. मिलिंद ठोके, उद्घाटक पोलीस उपनिरीक्षक अश्विनी सानप, नवापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. मयूर पाटील यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष शिरीषभाई शाह यांनी विद्यार्थिनींनी अभ्यासासोबतच स्वसंरक्षणाच्या कला आत्मसात करून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सक्षम व्हावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय मनोगतातून विपीनभाई चोखावाला यांनी कोणत्याही आव्हानाचा सामना करण्यासाठी केवळ शारीरिक ताकद पुरेशी नसून मनोबल, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी लाठी-काठी प्रशिक्षक प्रा. मिलिंद ठोके यांनी सादर केलेल्या दानपट्टा प्रात्यक्षिकाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. विद्यार्थिनींनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रशिक्षणाबाबत मोठा उत्साह व्यक्त केला.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. गणेश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन हेमलता बोरसे यांनी केले.

# दुचाकीवरील अपघातग्रस्तांना आर.टी.ओ. पथकाची मदत

**नंदुरबार, दि.६(प्रतिनिधी)- विसरवाडीनवापूर रस्त्यावर चिंचपाडा बायपासजवळ दोन दुचाकींच्या झालेल्या अपघातातील जखमींना आरटीओ पथकाने तत्काळ मदत करून उपचारासाठी रुग्णालयात रवाना केले.**



मंगळवारी (दि. ६) सकाळी सुमारे ११:१५ वाजता मोटार वाहन निरीक्षक विजय दिघे तसेच वाहनचालक प्रवीण गिरासे व सचिन बागुल हे आरटीओ वाहनासह नियमित वाहन तपासणी करीत होते. त्यावेळी चिंचपाडा बायपासजवळ रस्त्याच्या कडेला दोन दुचाकीस्वार अपघातग्रस्त अवस्थेत जखमी पडलेले आढळून आले. प्रथमदर्शनी दोन दुचाकींची एकमेकांशी धडक झाल्याचे दिसून आले. जखमींना तातडीने वैद्यकीय मदत मिळणे आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन मोटार वाहन निरीक्षक विजय दिघे व आरटीओ पथकाने तत्काळ १०८ रुग्णवाहिका सेवेशी संपर्क साधला. काही वेळातच रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. जखमींना रुग्णवाहिकेतून पुढील उपचारासाठी रुग्णालयात रवाना करण्यात आले. अपघातानंतरचा गोल्डन अवर हा जखमींच्या उपचारासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. हे लक्षात घेऊन आरटीओ पथकाने तत्परतेने कार्यवाही केल्याने जखमींना वेळेत वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात पोहोचविणे शक्य झाले.



# डॉ.घोगरे विज्ञान महाविद्यालयात माता पालक मेळाव्यात जनजागृती

**धुळे, दि.७- धुळे येथील श्री शि.वि.प्र. संस्थेचे कै. कर्मवीर डॉ.पा.रा.घोगरे कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात माता पालक मेळावा नुकताच संपन्न झाला. यावेळी माता पालक संघ आणि इनरव्हील क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड डिस्ट्रिक्ट३०६ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थीनी तसेच माता पालक यांच्यासाठी मासिक पाळी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.**

श्री शि.वि.प्र. संस्थेचे कै. कर्मवीर डॉ.पा.रा.घोगरे कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय धुळे येथे विद्यार्थी,विद्यार्थीनी,पालकांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्याअनुषंगाने नुकताच मासिक पाळीविषयी अंधश्रध्दा,पाळी दरम्यान घ्यावयाची दक्षता या विषयावर आरोग्य मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षणच्या विषय तज्ञ वैशाली पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच कु.विहा पाटील यांनी दौपदी या विषयावर सादरीकरण केले. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या मातांचा त्यांच्याच मुलींच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.एम. व्ही.पाटील, उपशिक्षणाधिकारी प्रतिभा ठाकूर, उपप्राचार्य आर. के.पाटील, इनरव्हीलच्या सेक्रेटरी रेखा बारी, वैशाली सिसोदे, माता पालक संघाच्या चेअरमन डॉ. सिमंतनी पाटील, शिल्पा वाघ, रेखा भदाणे, विद्या बागुल, छाया पाटील,विद्या पाटील, राजेश्वरी पाटील, प्रज्ञा शिंदे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रम राबविल्याबद्दल माता पालकांनी समाधान व्यक्त केले.

## लखमापूरला पाईपने मायलेकीला मारहाण

धुळे, दि.७- किरकोळ कारणावरून झालेल्या मारहाणीत माय लेक जखमी झाल्याची घटना लखमापूर (ता. साक्री) येथे घडली. संशयितांनी लोखंडी पाइप, फायटर, चाकूने, काठीने मारहाण केली. याप्रकरणी निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी आठ ते नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

राहुल चिंधा बाचकर (वय २५), त्याची आई देऊबाई चिंधा बाचकर (वय ५५, रा. लखमापूर) यांना शिवीगाळ, दमदाटी करुन मारहाण केली. एकाने चाकूने मारल्याने राहुलच्या पाठीला दुखापत झाली.

### नरडाण्याच्या एमआयडीसीतून
# आठ लाखांचा बाटलीबंद पाणी साठा जप्त
# अन्न व औषध प्रशासन पथकाची कारवाई

**धुळे, दि.७- अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने नरडाणा (ता. शिंदखेडा)एमआयडीसीतील एका बाटलीबंद पाणी कारखान्यावर छापा टाकून कारवाई केली. आठ लाखांचा बाटलीबंद पाणीसाठा जप्त केला. तपासणीसाठी पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले.**

राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र या विशेष मोहिमेअंतर्गत छापा टाकला.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या धुळे येथील पथकाने नरडाणा इंडस्ट्रियल एरियातील बाटलीबंद पाणी आस्थापनेची तपासणी केली. तपासणीत त्या ठिकाणी पॅकेजिंग आणि दर्जाबाबत




संशयास्पद बाबी आढळल्या. त्यानुसार पथकाने तीन नामांकित ब्रँड्सचे नमुने पुढील विश्लेषणासाठी ताब्यात घेतले. तिनही ब्रँड्सचे मिथ्याछाप व निकृष्ट दर्जाचे असल्याचा पथकाला संशय आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी कारखान्यातील ८० हजार २०८ बॉटल्स पाणीसाठा जप्त केला. या साठ्याची एकूण बाजारपेठेत किंमत आठ लाख एक हजार ६३२ रुपये इतकी आहे. जप्त केलेले पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती प्रशासनाने दिली. सहाय्यक आयुक्त (अन्न) गो. वि. माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, शशिकांत राणे, अभिजीत जाधव, अरविंद राऊत, मंगेश भावसार (अन्न व औषध प्रशासन, धुळे) यांनी कारवाई केली.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

**NAME CHANGE**
I HAVE CHANGE MY NAME FROM
**SHEIKH AJIM SHEIKH RASHID**
TO
**SHAIKH AZIM SHAIKH RASHEED**
ADD- 204. MILLAT NAGAR, VADJAI ROAD, OPP. AKBAR BEG MIRZA GARDEN, DHULE-424001

**NAME CHANGE**
I HAVE CHANGE MY NAME FROM
**SHAHIN SALIM SHAIKH**
TO
**SHAHIN BANO AZIM SHAIKH**
ADD- 204. MILLAT NAGAR, VADJAI ROAD, OPP. AKBAR BEG MIRZA GARDEN, DHULE-424001

**NAME CHANGE**
I HAVE CHANGE MY NAME FROM
**SHEIKH RASHID SHEIKH KASAM**
TO
**SHAIKH RASHEED SHAIKH KASAM**
ADD- 204. MILLAT NAGAR, VADJAI ROAD, OPP. AKBAR BEG MIRZA GARDEN, DHULE-424001

**NAME CHANGE**
MY OLD NAME WAS
**NIKHAT PARVEEN NAZIMUDDIN**
MY NEW NAME IS
**PARVEEN BANO NAZIMUDDIN**
ADD- 60B PLOT NO 11, HAZAR KHOLI, KAMGAR NAGAR, DHULE.

## शिरपूर वरवाडे नगरपरिषद
ता.शिरपूर, जि.धुळे, पिन ४२५४०५
E-mail Id:-shirpurnagarparishad@gmail.com Phone No. ०२५६३-२५५०४२/२५५७४२

जा.क्र/२७१९/पा.पु.विभाग/२०२६-२०२७ दि.०७/१०/२०२६

### जाहिर निविदा सूचना

म.मुख्याधिकारी, शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर जि.धुळे द्वि-लिफाफा पद्धतीने पात्र कंत्राटदार/मक्तेदार/पुरवठाधार/अधिकृत विक्रतेआदी. कडून न.प.पाणीपुरवठा विभाग लॅबमधील पाणीनमुने तपासणीकरीता आवश्यक रिएजंटस खरेदी करणे या कामाकरिता निविदा मागवीत आहे. को-या निविदा फॉर्म सदर निविदा प्रसिद्धी झालेपासून ७ दिवसाच्या आत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत प्रसिद्धी दिनांकापासून ते दि.१६/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क न.प.ने राखून ठेवला आहे.

(प्रशांत सरोदे) मुख्याधिकारी — (श्री.चिंतनभाई पटेल) नगराध्यक्ष
शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर जि.धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबंधीतांना तसेच सर्व राष्ट्रीय कृत बँका, सहकारी बँकास, नागरी सहकारी पतसंस्था व वित्तीय संस्था खाजगी सावकार यांना या सदरच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे धुळे, वलवाडी ता.जि.धुळे येथील महानगरपालीका हद्दीतील सर्व्हे नं.६७/२ ब पैकी प्लॉट नं.६८ चे एकूण क्षेत्र चौ.मि.१८६ या मिळकतीतील दक्षिणेकडील भागाचे म्हणजेच प्लॉट नं.६८अ अविभक्त क्षेत्र ९३.०० चौ.मि. यामधील लोडबेअरिंगचे बांधीव घर एकूण क्षेत्रफळ ९३ चौ.मि.व उर्वरित बखळ जागेसह त्याची चतुसिमः खालील प्रमाणे -

पुर्वेस- वापर व रस्ता, पाश्चिमेस-सि.स.नं.३३३१
उत्तरेस-याच मिळकती पैकी उर्वरित भाग, दक्षिणेस- सि.स.नं.३३३३

ही मिळकत श्रीमती वर्षा राजाराम सोनवणे व श्री. पंकज चंद्रकांत साळुंके रा.धुळे यांच्या मालकीची असुन कब्जे उपभोगातील आहे. सदर वर वर्णनाची मिळकत ही आमचे पक्षकार सौ.योगिता योगेश गजरे व श्री.किरण योगेश गजरे यांनी सदरची मिळकत ही कायम स्वरूपी खरेदीने घेण्याचे ठरले आहे. तसा सौदा आमचे पक्षकाराने केलेला आहे. तरी आमचे पक्षकार लवकरच वरील मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम जनतेस या सदरच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील मिळकत निर्बेध निर्जोखीम व बोजारहित असल्याचा भरवसा आमचे पक्षकारास मालकाने दिलेला आहे. असे असतांनाही सदरच्या वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, दान, लिज, लिन, बक्षिस, साठेखत, विसार, पावती, तारण, कर्ज, बोजा, करारमदार, अन्नवस्त्रय, पोटगी, मनाई हुकूम ताबा, अदलाबादल, भाडेकरार, कोर्ट कचेरी हुकूम, वादविवाद, करारनामा कर्ज बोजा विषयी कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार वारस हक्क असल्यास त्यांनी सदरील जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात दिवसांचे आत कायदेशीर कागदोपत्री लेखी पुराव्यासहीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे पुराव्यानिशी लेखी हरकत दस्तऐवजांसह दाखल करावी व आमची व आमचे पक्षकारांची खात्री पटवून द्यावी. वरील विहित मुदतीत कोणीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार दाखल न केल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कोणताही हक्क, वारसा हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे असे गृहित धरण्यात येऊन सदर मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार पुर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे होणा-या खर्चास व परिणामास आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आमचे मार्फत पक्षकारांने दिलेल्या माहितीनुसार व सांगितल्यावरून प्रसिद्धीस दिले असे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे. धुळे, दिनांक- ०७/१०/२०२६.

**ॲड.संजय ए.निंबाळकर, मनिषा संजय निंबाळकर**
प्लॉट नं.६६ जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे.
**मो.नं.९४२२२६६५५०**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबधितांना प्रस्तुतच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- तु.जि.नंदुरबार पो. तु.ता.शहादा पैकी मौजे मंदाणे ग्रां.प. हद्दीतील ग्रा.पं. मिळकत क्र.१३२३ यात आरसीसी बांधकाम असलेले क्षेत्र २५० चौ.फु. (२५x१० फु.) गिंल्डर क्षेत्र १००० चौ.फु. (२५x४०) फु. आणि पत्रा घर बांधकाम असलेले क्षेत्र २०० चौ.फु. (५x४० फु.) = एकुण क्षेत्र १४५० चौ.फु. मिळकत यासी चतुःसिमा :-

पुर्वेस :- मोहन फत्तु पावरा यांची मिळकत
पश्चिमेस :- गणेश कांतीलाल पावरा यांची मिळकत
दक्षिणेस :- रस्ता
उत्तरेस :- रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमांकित मिळकत ही सुनिल रोहिदास सोनवणे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील असून सदर मिळकतीवर ते पिरॅमल कॅपिटल ॲण्ड हाउसिंग फायनान्स लि. यांचेकडून कर्ज घेत आहे. तरी, सदर वर नमूद मिळकतीबाबत तारण, गहाण, लिज, भोडेपटट्टा, सरकारी, निमसरकारी, वैयक्तिक कर्ज, वारस, दावे-फाटे, सौदापावती इ. कोणत्याही स्वरूपाचा हितसंबंध असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील नमुद पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी. विहीत मुदतीत कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची लेखी हरकत न आल्यास सदर वर नमुद मिळकत निर्बेध व निर्बोज समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकती, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकती तोंडी हकरती यांची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. तसेच ते आमचे अशिल रोहिदास संभु सोनवणे वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सुनिल रोहिदास सोनवणे
नोटीस देणार

सदरची जाहिर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहीती, दस्तऐवज, अधिकारावरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे.
धुळे, दिनांक:- ०७/१०/२०२६.

**ॲड.सागर पी.सोनवणे**
४, शिव कॉलनी, मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे
**मो.नं.९४२०३७३५३०**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँकाना हितसबंधितांना सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि मिळकतीचे वर्णन मौजे वलवाडी येथील स.नं.६७/२/ब पैकी प्लॉट नं १२ चे एकूण क्षेत्र १९८.७५ चौ मी यापैकी लिहुन देणार यांच्या मालकीच्या उत्तेरकडील भागाचे क्षेत्र ९९.४१ चौ मी बांधीव मिळकत व उर्वरीत बखळ प्लॉट यास वि सि स नं ३३७७ चे क्षेत्र २३६.५० चौ मी सत्ताप्रकार क यापैकी लिहुन देणार यांच्या मालकीच्या उत्तेरकडील भागाचे क्षेत्र ९९.४१ चौ मी बांधीव मिळकत व उर्वरीत बखळ प्लॉट.यासी मापे व चतुःसिमा-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेसे- | ७.५० मी.सु, | लागू स नं. |
| पश्चिमेस- | ७.५० मी सु, | रस्ता, |
| दक्षीणस- | १३.२५७ मी सु | प्लॉट नं १२ पैकी उर्वरीत भाग |
| उत्तरेस- | १३.२५७ मी सु | प्लॉट नं १३ |

येणे प्रमाणे हि मिळकत श्री संदिप प्रकाश वाघ रा धुळे ता जि धुळे यांच ताबे उपभोगातील मालकीची होती व आहे सदर मिळकत हि आमचे पक्षकाराने तोंडी सौदा केला आहे. ह्या मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार संबधीत व्यक्ती पुर्ण करणार आहे.

तरी सर्वना या जाहिर नोटीसणे कळविण्यात येते कि सदर मिळकत संबधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित संबध, देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपट्टा व लीज ताबा गहान, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच, व वारस हक्क खावटी ज.मु. वैगेरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व आधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्या पासुन ०७ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या प्रती सहित आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रात आल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकर सदर मिळकत हि निर्बोज म्हणुन खरेदी करतील नंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस होय
स्थळ-धुळे, दिनांक:- ०७/१०/२०२६.

**ॲड.आशा शिवकुमार डोंगरे**
(नोटरी भारत सरकार)
एफ ५६ पहिला मजला गरूड कॉम्प्लेक्स साक्री रोड, धुळे
**मो.नं.९९२३३६६१११**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय, संस्था बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**- मौजे बोरकुंड ता.जि.धुळे येथील गट नं.५७७ चे ला.ला.२ हे.३० पो.ख.०० हे.२७ आर एकुण क्षेत्र २.हे.५७ आर चा आकार ०२रू.८० पैसे यापैकी श्री.विजय लहु अहिरे २) दादाभाऊ लहु अहिरे ३) कमलाबाई भगवान पवार रा.चिंचवार ता.जि.धुळे यांच्या हिस्साचे क्षेत्र एकूण क्षेत्र ०२ हे.२० ची सामाईकातील अविभक्त हिस्साची जिरायत शेत जमिन अशी मिळकत यास वहीवाटी प्रमाणे वापर व रस्ता राहील.

यासी संपूर्ण गटाची चतु:सिमा
पुर्वेस : रविंद्र साहेबराव पाटील यांचे शेत
पश्चिमेस : रस्ता
दक्षिणेस : विश्वास शंकर अहिरे यांचे शेत
उत्तरेस : जगन तुळशिराम बागुल यांचे शेत

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील मिळकत ही वर नमूद मालकांचा संयुक्त मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांचा कडुन सदर मिळकती या आमचे अशिलांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असुन सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडुन त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्तयावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून पत्यक्ष भेटुन शहानिशा करून खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्बंध व वरील नमुद मिळकत ही वर नमुद मालकांच्या संयुक्त मालकीची असल्याचे गृहीत धरून खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानापत्रातुन घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधणकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरून त्यांचेतर्फे आमचेमार्फ प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ०७/१०/२०२६.

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरीसर, धुळे
**मो.नं.९४२२७७१२७४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

स.नं. ४२७/१/१ (७/१२ उताराप्रमाणे) व ४२७/४ (मोजणी शीटप्रमाणे) पैकी प्लॉट नं.१२ चे एकूण क्षेत्र २९२.५० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र १२०.०० चौ.मी. बखळ प्लॉट.

सि.स.उताराप्रमाणे- सि.स.नं.१४५६८/२३ चे एकूण क्षेत्र २९२.५० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र १२०.०० चौ.मी. बखळ प्लॉट हे जियाउर्रहेमान अब्दुर्रहेमान अन्सारी रा. मिल्लत नगर, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजुर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक यांनी वर नमुद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यार पत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक- ०७/१०/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.
**मो.नं.९८८१९२९४२४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल. येथील महानगरपालिका हद्दीतील.

गट नं.७२ पैकी प्लॉट नं.७५ चे क्षेत्र ११२.५० चौ.मी. बखळ प्लॉट. हे शकील बेग इस्माईल बेग मिर्झा यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजुर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक शकील बेग इस्माईल बेग मिर्झा रा.आझाद नगर वडजाई, धुळे यांचे तर्फे स्पेशल मुखत्यार म्हणुन इजहार अहमद मुख्तार अहमद रा. फिरदोस नगर धुळे, यांनी वर नमुद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक- ०७/१०/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.
**मो.नं.९८८१९२९४२४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बॅका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे ता.जि.धुळे येथील स.नं.४१४/२ पैकी प्लॉट नं.३८, चे एकुण क्षेत्र २०६.०५ चौ.मी. यापैकी समाईकातील अविभाज्य पश्चिमेकडील पश्चिम भाग ६४.४ चौ.मी.बखळ प्लॉट. यास विस्तारित सि. स. नं.१३६२५ चे एकुण क्षेत्र १८५.२ चौ.मी. सत्ताप्रकार-क यापैकी सामाईकातील अविभाज्य पश्चिमेकडील पश्चिम भाग ६४.४० चौ.मी. बखळ प्लॉट त्याची चतुःसिमा नकाशा रेकॉर्डप्रमाणे.

सदर सविस्तर नमूद केलेली मिळकत ही मोहम्मद सुभान अब्दुल हमीद अन्सारी, रा.कबीरगंज, धुळे, ता.जि.धुळे याचे नावे व कब्जे ताबेउपभोगात आहे. सदर मिळकतीचा खरेदी करण्याचा व्यवहार आमचे पक्षकार इरशाद खान सिकंदर खान, रा.धुळे, ता.जि.धुळे यांनी मिळकत मालकांशी व्यवहार केलेला असून त्याबाबतची बयाणा देखील दिलेला आहे. व त्याचप्रमाणे आमचे पक्षकार हे लवकरच खरेदीखत देखील नोंदविणार आहे.

तरी सर्वना या जाहीर नोटीसणे कळविण्यात येते की, सदर मिळकत सबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, साबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपटटा, व लीज, ताबा, गहाण, दोन, बोजा, कर्ज, लीज, टाच, वा वारस हक्क, खावटी दृ म.जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे (०७) सात दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्राची प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमापत्रावर असल्यास त्या ग्राहय धरण्यात येणार नाही. व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणुन खरेदी करतील. त्यानंतर आलेल्या हरकती हया ग्राहय धरल्या जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे, दिनांक- ०६/१०/२०२६.

**ॲड.परवेज निसार तांबोळी**
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे.
**मो.नं.७०२०३८१३९४**

## जाहीर नोटीस

ॲड.डि.एम.राऊळ, शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार, मो.नं.९५६१४९९५५५

### शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो., (स्तर) यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.४२५/२०२६

श्री.भास्कर रामचंद्र निकुंभ, उ.व.७०, धंदा- मजुरी, रा.मंदाणे, ता.शहादा, जि.नंदुरबार. ....अर्जदार

विरूध्द

निरंक ....जाबदेणार
कै.रामचंद्र शिवराम सुतार/मिस्तरी (निकुंभ) ....मयत

अर्ज:- दि.बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चाप्टर तखखख चे कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

ज्या आर्थी अर्जदाराचे वडील कै.रामचंद्र शिवराम सुतार/मिस्तरी (निकुंभ) हे मौजे मंदाणे, ता.शहादा, जि.नंदुरबार येथे मयत झाले असून, अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदाराला त्यांची वडील कै.रामचंद्र शिवराम सुतार/मिस्तरी (निकुंभ) यांच्या वारस दाखल्याची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदारांने कै.रामचंद शिवराम सुतार/मिस्तरी (निकुंभ) यांचे १) श्री.भास्कर रामचंद्र निकुंभ (मुलगा), २) कमलबाई केशव जगताप (मुलगी), ३) मिनाबाई शांतीलाल बोरसे (मुलगी), ४) बेबीबाई पुरुषोत्तम सुतार (मुलगी), ५) श्रीमती.निर्मलाबाई देविदास निकुंभ (सुन), ६) ज्योती माधव खैरनार (नात), ७) आशा मनोज देवरे (नात), ८) चारुशीला माधव खैरनार (नात), ९) दर्शना चतूर सोनवणे (नात) हे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज म.न्यायालयात दाखल केला आहे. या बाबत कुणाला काही हरकत असल्यास त्या आर्थी सदर अर्जासंबधी कुणाला काही सांगयचे असेल, अथवा मांडायचे असेल, ते सांगण्यासाठी एका महिण्याच्या आत अथवा दि.२/११/२०२६ रोजी दिवसा १०.३० वाजता स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत. व जो सदर अर्जासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकेल, वकीला मार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे जाहीर करण्यात येत आहे. त्या दिवशी त्यांनी बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे त्याच दिवशी त्यांचा बचाव उलट तपास किंवा प्रतीसाद ज्या दस्तऐवजांवर आधारलेला असेल असे दस्तऐवज सादर करावेत व अशा दस्तऐवजांची एक सूची करून ती त्यांच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

याद्वारे तमाम लोकांना जाहिर समन्स/नोटीस देन्यात येत आहे की, एका महिन्याच्या आत अथवा वर नमुद केलेल्या दिवशी कोणीही उपस्थित न राहिल्यास अथवा हरकत न आल्यास सदर अर्जाची सुनावानी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल.

आज दि.६/१०/२०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाच्या सहिशिक्यानिशी दिले.

आदेशावरून
(शिक्का) सहा. अधिक्षक
म.दिवाणी न्यायालय (व.स्तर), शहादा

**पान १ वरुन**

## दिल्लीत दहाच्या आंदोलनास सीजेपीला परवानगी नाही

दिल्ली पोलिसांकडून कोणता निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष आहे. दरम्यान, तीन ऑक्टोबर रोजी झालेल्या सीजेपीच्या आंदोलनादरम्यान वाद निर्माण झाला होता. तीन महिला पत्रकारांनी काही पोलीस अधिकाऱ्यांवर लैंगिक छळ आणि गैरवर्तनाचे आरोप केले होते. या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर दिल्ली पोलिसांनी निष्पक्ष तपासासाठी प्रकरण गुन्हे शाखेकडे सोपवले आहे. आता दहा ऑक्टोबर रोजी पुन्हा आंदोलनाची तयारी सुरू झाल्याने तसेच नवी दिल्ली परिसरात कलम १६३ लागू असल्याने पोलिसांच्या परवानगीच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

## दिल्लीत राहुल गांधी पुन्हा गनीमी काव्याने

आयोगाच्या कार्यालयापर्यंत पोहोचू नये, यासाठी विविध मार्गांवर बॅरिकेडिंग करण्यात आली असून काही रस्ते बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे दिल्लीत पुन्हा एकदा राजकीय संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**खरगे यांचा सरकारवर गंभीर आरोप**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी जनपथ येथील निवासस्थानी इंडिया आघाडीतील प्रमुख नेत्यांसाठी विशेष बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला काँग्रेस सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओ ब्रायन, राजदचे खासदार मनोज झा, माकपचे जॉन ब्रिटास, झामुमोचे खासदार विजय यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. यावेळी खरगे यांनी देशात सुरू असलेल्या अन्यायाविरोधात विरोधकांचा लढा सुरूच राहणार असल्याचे सांगितले. स्वातंत्र्यानंतर नागरिकांना मिळालेला प्रौढ मताधिकार संपवण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्त सरकारच्या हातातील बाहुले बनले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह सांगतील त्याप्रमाणे ते काम करत असल्याचा आरोपही खरगे यांनी केला. हा लढा पुढेही सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

**आम्ही एफआयआरला घाबरत नाही**

काँग्रेस नेते पवन खेडा यांनीही आंदोलनाबाबत आक्रमक भूमिका घेतली. पोलिसांच्या एफआयआरला काँग्रेस नेते घाबरत नसल्याचे त्यांनी सांगितले. एफआयआर होणे ही आमच्यासाठी सन्मानाची गोष्ट असल्याचे खेडा यांनी म्हटले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात पुढे काय-काय घडते, ते पाहत राहा, असा इशाराही त्यांनी दिला. सत्तेत असलेले हे लोक आता जाण्याच्या मार्गावर असल्याचा टोलाही त्यांनी लगावला. दरम्यान, विरोधकांच्या संभाव्य मोर्चाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली असून, आज पुन्हा एकदा राजधानीत राजकीय संघर्षाचे चित्र पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

**निवडणूक आयोग स्वायत्त आहे का?**

पोलिसांनी राहुल गांधींना ताब्यात घेतल्यावर सीजेपीने निषेध करीत निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रश्न उपस्थित केला आहे. सीजेपीचे अभिजीत दीपके आणि आशुतोष रांका यांनी निषेधात्मक प्रतिक्रिया नोंदविल्या. देशात आधी विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर पत्रकारांवर कारवाई करण्यात आली. आता थेट लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य निवडणूक आयुक्तांची भेट घेण्यापासून का रोखले जात आहे. या कृतीमुळे निवडणूक आयोग ही खरोखर निष्पक्ष आणि स्वतंत्र संस्था आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांनी आकाशवाणी भवनाच्या परिसरात राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि इंडिया आघाडीचे नेते ठिय्या आंदोलन करत असल्याचा व्हिडिओही सोशल मीडियावर शेअर केला. राहुल गांधी आणि अन्य विरोधी नेत्यांना ताब्यात घेण्याच्या कारवाईमुळे निवडणूक आयोग, सरकार आणि विरोधक यांच्यातील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## जिल्ह्यातील मतिमंद, ऑटिझम, बहुअपंगत्वाचे

मतिमंद मुलांचे पालक आधीच मानसिक आणि आर्थिक संकटात असतात. त्यांच्या हक्काचे अर्ज तीन-तीन वर्षे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित राहणे हा प्रशासनाचा असंवेदनशीलपणा आहे. कायद्यानुसार या समितीच्या बैठका नियमित होणे गरजेचे असतानाही यामध्ये दिरंगाई का होत आहे? आम्ही या प्रकरणी माहितीच्या अधिकारांतर्गत आणि दिव्यांग कल्याण आयुक्तांकडे पाठपुरावा करत आहोत. प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन हे अर्ज मंजूर केले नाहीत, तर पालकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा माजी प्रदेश सदस्य, भाजपा व समाजसेवक महेश काटकर यांनी दिला आहे.

या प्रकरणात आता तात्काळ धुळे जिल्हा प्रशासनाने दखल घेऊन विशेष मोहीम राबवावी आणि प्रलंबित प्रमाणपत्रे वाटप करावीत, अशी मागणी धुळे जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांच्या पालकांकडून केली जात आहे.

## निहारीका कोळीचा संशयास्पद मृत्यू

बांधवांच्यावतीने निहारीका कोळी ही विद्यार्थीनी नवोदय विद्यालय, अक्कलकुवा येथे शिक्षण घेत असताना हुशार व गुणी व्दिार्थीनी होती. तिच्या दुर्दैवी व संशयास्पद मृत्युमुळे तीच्या कुटुंबीयांवर मोठे दुःख कोसळले असून,या घटने बाबत अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

सदर कुटुंबीय आणि नातेवाईकांच्या निदर्शनास आलेल्या बाबींवर आधारित सत्य परस्थिती तपासातून निष्पन्न होणे आवश्यक आहे. मृत्यूपूर्वी काही दिवसांपासून निहारीकाची प्रकृती बघिडलेली असल्याचे सांगण्यात येते.मात्र पालकांना याबाबत वेळेवर व पुरेशी माहिति देण्यात आली का, याची चौकशी होणे आवश्यक आहे.शाळेकडून मिळालेल्या माहितीत आणि वेळेबाबत काही विसंगती असल्याचा संशय आहे.मृत्यूपूर्वी घटनेच्या दिवशी व्दिार्थीनीची प्रकृती,तिला मिळालेली वैद्यकीय मदत,संबंधित कर्मचारी अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही व पालकांशी झालेला संपर्क यांची सखोल तपासणी करावी. आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शाळेतील सीसीटीव्ही फुटेज, उपस्थिती नोंदी, वसतीगृह । हॉस्टेल नोंदी, कॉल रेकॉर्ड, वैद्यकीय कागदपत्रे, औषधोपचाराची नोंद व संबंधित कर्मचाऱ्यांचे जबाब सुरक्षित करून तपासण्यात यावे.

निहारीका कोळी हिच्या मृत्यूची निष्पक्ष, सखोल व पारदर्शक चौकशी करण्यात यावी. आवश्यक असल्यास सी.आय.डी. अथवा सी.बी.आय. सारख्या स्वतंत्र तपास यंत्रणेमार्फत चौकशी करून सर्व संबंधित व्यक्तीचे जबाब नोंदवावेत.सीसीटीव्ही फुटेज, कॉल रेकॉर्ड, वैद्यकीय अहवाल, पोस्टमॉर्टम / शवविच्छेदन अहवाल, हॉस्टेल व शाळेच्या नोंदी यांसह सर्व पुरावे तात्काळ सुरक्षति ठेवावेत. घटनेत कोणाचा निष्काळजीपणा, कर्तव्यात कसूर किंवा इतर कोणतीही कायदेशीर बाब आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. निहारीकाच्या कुटुंबीयांना चौकशीची प्रगती व नष्किर्ष याबाबत अधिकृत माहिती देण्यात यावी. आदि मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

यावेळी जितेंद्र जगदाळे, प्रवीण निकुमे,अँड. दिनेश कोळी, योगेश सावळे, भूषण अहिरे ,शांताराम जगताप ,गणेश बागुल,अनिल निकुम, पांडुरंग ठाकरे ,हर्षल वाघ ,भटू वाघ, जितेंद्र जगताप, संदीप सोनवणे, ज्ञानेश्वर जगताप यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

## निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम

मताची असते.मतदाराचा विश्वास,मतदानाची पारदर्शकता आणि निवडणूक प्रक्रियेची निष्पक्षता यांना सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. जनतेच्या मनातील शंका दूर करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांची आहे.लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून,प्रत्येक नागरिकाला आपल्या मताचा अधिकार निर्भयपणे आणि विश्वासाने बजावता येणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे या मागण्यांसाठी काँग्रेस पक्ष जनतेच्या लोकशाही अधिकारांच्या बाजूने ठामपणे उभा राहणार असल्याचे मत काँग्रेसचे आलोक रघुवंशी यांनी व्यक्त केले आहे.

**पान १ वरुन**

## शिरपूर तालुक्यात दोनशे तीस पाणंद रस्ते मंजूर

रोजीसकाळी १०.३० वाजता शिरपूर तालुक्यातील उंटावद येथे माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार काशिराम दादा पावरा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आ.अमरीशभाई पटेल बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आपण केवळ आजचा विचार करत नाही, तर पुढील ३० वर्षांचा विचार करून विकासाची कामे करीत आहोत. शिरपूर तालुक्यात पाण्याच्या उपलब्धतेसाठी मोठ्या प्रमाणात काम केले असून, भविष्यातही ही कामे सुरू राहणार आहेत. आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्या. तालुक्याच्या सर्वांगीण विकासाबरोबरच आरोग्य सुविधा, हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज आदी क्षेत्रांमध्येही विकासाला प्राधान्य दिले जात आहे.

**काळाची गरज ओळखून योजना सुरू- आ.पावरा**

यावेळी आमदार काशिराम पावरा यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शासनाने ही महत्त्वपूर्ण योजना सुरू केल्याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले. ते म्हणाले की, शिरपूर तालुक्यातील शेतकरी बांधवांना पाणंद रस्त्यांचा मोठा फायदा होणार असून, संपूर्ण तालुक्यात टप्प्याटप्प्याने पाणंद रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता अनावश्यक खर्च टाळून साधेपणाने कार्यक्रम घेण्याबरोबरच उपलब्ध साधनसामग्री विकासकामांकडे वळविण्यावर भर देण्यात येईल. रस्त्यांच्या कामांमध्ये गुणवत्ता आणि दर्जा कायम राखला जावा, यासाठी विशेष प्रयतक केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**डिसेंबर २०२५ मध्ये योजनेला सुरुवात**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपविभागीय अधिकारी डॉ. शरद मंडलिक यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत डिसेंबर २०२५ मध्ये मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्यातील पहिल्या रस्त्याचे भूमिपूजन उंटावद येथे होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम पावरा यांच्या नेतृत्वाखाली शिरपूर तालुक्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी, बाजार समिती सभापती के.डी. पाटील, माजी जि.प.उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, लोकनियुक्त सरपंच मनिषा राजकपूर मराठे, कृऊबा उपसभापती लक्ष्मीकांत पाटील, पाणंद रस्ता समिती सदस्य जगतसिंग राजपूत, बाळासाहेब पाटील, इंद्रसिंग पावरा, विविध खात्याचे अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पोलीस पाटील राजू सातकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामसेवक नगराज देवरे यांनी केले.

## तिसरा बिबट्याही झाला जेरबंद

आदेश वरिष्ठांनी दिले. अर्थे बु., भरवाडे, टेंभे, टेकवाडे, खामखेडा, नवे लोंढरे, जुने लोंढरे, वरखळ, विखरण, नवे व जुने भामपूर, जळोद आदी परिसरात बिबट्याचा शोध सुरु होता. दोन ऑक्टोबरला पांडुरंग माळी यांच्या शेतात घराजवळ ट्रँक्विलायझर गनद्वारे बिबट्याला डार्ट करून बेशुद्ध करुन ताब्यात घेतले. पाच ऑक्टोबरला भरवाडे शिवारातील पिंजऱ्यात बिबट्याची पूर्ण वाढ झालेली मादी जेरबंद झाली. सहा ऑक्टोबरला अर्थे शिवारातील पिंजऱ्यात सुमारे दीड वर्ष वयाचा बिबट्या जेरबंद झाला. एकाच कुटुंबातील मादी व तिची दोन पिले असल्याचा अंदाज आहे. दरम्यान, या परिसरात आणखी काही बिबटे आहेत का याचा शोध वनविभागाने सुरु ठेवला आहे. मुख्य वनसंरक्षक मोहन नाईकवाडी, उपवनसंरक्षक राजेंद्र सदगीर, विभागीय वन अधिकारी राहुल घरटे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी किरण गिरवले, विशाल दुराने, सुनील जोग, भूषण वाघ, योगेश वारुळे यांच्यासह शिरपूर उपवनविभागातील वनपाल, वनरक्षक, वनमजूर व वाहनचालकांनी कारवाईत सहभाग घेतला.

## मनपात शहरातील पथविक्रेत्यांसाठी

मेळाव्यात पीएम स्वनिधी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या कर्ज प्रस्तावांच्या लाभार्थ्यांना थेट धनादेशाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच योजनेअंतर्गत दुसऱ्या कर्जाची नियमित परतफेड केलेल्या पात्र पथविक्रेत्यांना बँकांच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना डिजिटल व्यवहारांसाठी क्यूआर कोड देण्यात येणार असून, यूपीआय व डिजिटल ऑन-बोर्डिंग सुविधेचे प्रात्यक्षिकही मेळाव्यात दाखविण्यात येणार आहे.

शहरातील नवीन पथविक्रेत्यांपर्यंत पीएम स्वनिधी योजनेचा लाभ पोहोचविणे, योजनेबाबत जनजागृती करणे, प्रथम, द्वितीय व तृतीय टप्प्यातील कर्जासाठी पात्र पथविक्रेत्यांना बँकांकडे अर्ज करण्यास प्रोत्साहित करणे, तसेच कर्ज मंजुरी व वितरण प्रक्रियेसाठी मनपा, बँका आणि लाभार्थ्यांमध्ये समन्वय साधणे, हा मेळाव्याचा प्रमुख उद्देश आहे.

मेळाव्यास शहरातील विविध वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, बँक व्यवस्थापक, डिजिटल पेमेंट भागीदार तसेच पीएम स्वनिधी सनियंत्रण समितीचे अधिकारी व सदस्य उपस्थित राहणार असून, ते पथविक्रेत्यांना योजनेबाबत मार्गदर्शन करणार आहेत. बँक प्रतिनिधी आणि पथविक्रेत्यांमध्ये थेट संवाद घडवून आणण्यासही या मेळाव्यात प्राधान्य देण्यात आले आहे. धुळे शहरातील सर्व पात्र पथविक्रेते तसेच नागरिकांनी दि.८ ऑक्टोबर २०२६रोजी आयोजित लोक कल्याण मेळाव्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन धुळे महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.



**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**


**पाहिजेत**

TASTY TOWN – FOOD & FESTIVE HUB
फूड कोर्ट (खाऊ गल्ली) साठी सुवर्णसंधी!
स्थान: प्रकाश टाकी जवळ, पारोळा रोड, धुळे
खाऊ गल्लीतील खाद्यपदार्थांची दुकाने भाडे तत्त्वावर उपलब्ध आहेत. तसेच, मार्केटिंगसाठी मुलं व मुली पाहिजेत
* आकर्षक पगार
* इन्सेन्टिव्हची सुविधा
* फ्रेशर्सना प्राधान्य
* चांगल्या संवाद कौशल्याला प्राधान्य
इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क:- विजय जैन
98231 63447
75887 35148

**पाहिजे**

ग्रॅज्युएशन झालेला तरूण मुलगा फुलटाईम ऑफीस कामासाठी पाहिजे .
Tally चा अनुभव असल्यास प्रधान्य.
-: संपर्क :-
प्रथमेश इंटरप्राईसेस
जयहिंद कॉलनी
मो.8087398233

**अकौंटंट पाहिजे**

लेडींज/जेन्टस
-: संपर्क :-
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड, प्रकाश टॉकीजसमोर, धुळे
9423135555

**पाहिजेत**

दुकान काम ऑर्डर करीता मुलगा/माणूस त्वरीत पाहिजे
पार्टटाईम-फुलटाईम
किसान केंद्र
गांधी पुतळा - धुळे
-: संपर्क :-
97301-25577
8799922502

**प्लॉट विकणे**

3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

**पाहिजेत**

अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे
9422286958


**पान १ वरुन**

## विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी

करताना नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताने प्रगतीच्या दिशेने मोठी झेप घेतली आहे. आज भारत अनेक क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भरतेने वावरत आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून पूर्वेच्या राज्यांपर्यंत आज भारत प्रत्येक क्षेत्रात विकास साधत आहे. डिजिटल क्रांती घडविली आहे. देशापुढील अनेक आव्हानांवर मात करण्यात केंद्र सरकार यशस्वी ठरले आहे. भारताच्या विकासाचे हे मॉडेल जगातील अन्य देशही आत्मसात करण्यासाठी धडपडत आहे.

विकसित भारताचा संकल्प करूया : रावल

पालकमंत्री रावल म्हणाले, की १४० कोटी देशवासीयांच्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी पंतप्रधान मोदी दिवस-रात्र झटत आहेत. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून जगापुढे आणण्यासाठी त्यांचे अहोरात्र प्रयतक सुरू आहेत. त्यामुळेच प्रभावित होऊन जगातील अनेक प्रमुख राष्ट्रे भारतात गुंतवणुकीसाठी पुढे येत आहेत. त्यातून भारत हा पायाभूत सोयी-सुविधांमध्ये अग्रेसर होत आहे. त्यांच्या या कार्याचे, मेहनतीचे अनुकरण करण्याची आपल्या प्रत्येकावर जबाबदारी आहे. त्यांच्याप्रमाणे भारताला समर्थ आणि विकसित राष्ट्र बनविण्यासाठी आपणही आपले गाव, शहर, जिल्हा, राज्य आणि देशाच्या विकासासाठी अहोरात्र काम करण्याचा, आपसांतील हेवेदावे बाजूला सारून देश घडविण्याचा संकल्प या निमित्ताने करावा, असे आवाहनही श्री. रावल यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत मशाल यात्रा

या कार्यक्रमानंतर देशाला विकसित राष्ट्र बनविण्याचा संकल्प करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी यासाठी पालकमंत्री रावल यांच्या नेतृत्वात आमदार अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालयापासून छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत मशाल यात्रा काढण्यात आली. तेथे पोहोचल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. यामध्ये आमदार अग्रवाल, आमदार भदाणे यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. मशाल यात्रेदरम्यान वंदे मातरम, छत्रपती शिवाजी महाराज की जय, भारत माता की जय आदी घोषणा देण्यात आल्या.

## टंचाई दूर करण्यासाठी अक्कलपाड्याचे पाणी

जाणाऱ्या चारापिकांना पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे, या मागणीसाठी अक्कलपाडा उजवा व डावा कालवा शेती पाणी हक्क संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मा.आ.कुणाल पाटील यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी धुळे तालुक्यातील शेतकरी तसेच पाणी हक्क संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांशी मा.आ.कुणाल पाटील यांनी सविस्तर चर्चाही केली. यावेळी पाणी हक्क संघर्ष समितीने जिल्हा आकस्मिक पाणी आरक्षण समितीच्या बैठकीत आगामी सन २०२६च्या रब्बी हंगामात लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच पाटकालव्यांचीही दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी केली. तसेच अक्कलपाडा धरणाच्या तळाशी असलेल्या गेटमधून धरणाच्या मृत साठ्यातील पाणी पांझरा नदीतून सोडणे शक्य आहे, त्यातून धुळे जिल्ह्यातील धुळे तालुका,शिंदखेडा तालुका व अमळनेर तालुक्यातील पांझरा नदी काठच्या गावांचे टंचाई परिस्थितीतील पाणी आरक्षण हे अक्कलपाडा धरणाच्या मृत साठ्यातून करण्यात यावे अशी मागणी अक्कलपाडा डावा व उजवा कालवा शेती पाणी हक्क संघर्ष समितीने केली आहे. शेतकरी व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करतांना मा.आ.कुणाल पाटील यांनी सांगितिले कि, दुष्काळात चारा टंचाई भासू नये म्हणून रब्बी हंगामात घेतली जाणारी चारा पिकांना पाणी देण्यासाठी अक्कलपाडा प्रकल्पातून दोन ते तीन आवर्तन सोडण्यात यावे यासाठी आकस्मिक पाणी आरक्षण समितीच्या बैठकीत पाणी आरक्षित करण्यात यावे म्हणून पालकमंत्री ना.जयकुमार रावल यांच्याकडे मागणी करणार आहे. दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांकडेही मागणी करण्यात आली आहे. मा.आ.कुणाल पाटील यांनी माहिती देतांना सांगितले कि, अक्कलपाडा धरणाची एकूण क्षमता ३८६० एमसीएफटी आहे. सद्यस्थितीत धरणात २२७० एमसीएफटी पाणी साठा उपलब्ध असून मृतसाठा वगळता १५४५ एमसीएफटी उपयुक्त पाणी साठा उपलब्ध आहे. या उपयुक्त पाणी साठ्यातून रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना चारा पिकांसाठी पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे. म्हणून धरणाच्या सद्यस्थितीतील पाणीसाठ्याचे सुक्ष्म नियोजन केल्यास पिण्यासाठी व चारा पिकांच्या शेतीसाठी असे समन्यायी पाणी वाटप करता येऊ शकते, त्यातून धुळे तालुका,शिंदखेडा तालुका,अमळनेर तालुका आणि धुळे शहरालाही पिण्यासाठी पाणी देता येऊ शकते असेही मा.आ.पाटील यांनी म्हटले आहे. अक्कलपाडा प्रकल्पांतर्गत कालव्यांवरील गेटसचीही दुरुस्ती करण्यात यावी, जेणेकरुन आवर्तन सोडतांना पाटकालव्याच्या पाण्याचा अपव्यय होणार नाही. आणि शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पूर्णक्षमतेने पोहचू शकेल म्हणून ही दुरुस्ती करण्यात यावी. तसेच अक्कलपाडा प्रकल्प शंभर टक्के भरण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया पुर्ण झाली नाही परिणामी १५००एमसीएफटी पाणी नदीपात्रात सोडावे लागले. म्हणून प्रलंबित भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करुन पुढील वर्षी धरण शंभर टक्के भरण्याची सोय करावी अशीही मागणी मा.आ.कुणाल पाटील यांनी केली आहे. दरम्यान शेतकरी तसेच पाणी हक्क संघर्ष समितीच्या मागण्यांबाबतचे पत्र पालकमंत्री तसेच जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. मा.आ.कुणाल पाटील यांना निवेदन देतांना पाणी हक्क संघर्ष समितीचे डॉ.लक्ष्मीकांत बोढरे नेर, प्रदिप देसले देऊर, पंकज वाघ, अजय माळी, सरपंच गवरलाल पाटील, आबा पगारे, दगडू माळी, नाना बोढरे, चैत्राम बागुल, प्रमोद पाटील, अशोक माळी, नारायण माळी,दिलीप बिरारी, मनोज पाटील, शामराव जाधव, प्रकाश माळी, पोपट माळी, मोहन जगताप, सुभाष माळी, पुरुषोत्तम बोढरे, गोविंद सोनवणे, गुलाब बोरसे यांच्यासह नेर, खंडलाय, बाबुंर्ले, देऊर, भदाणे, लोहगड, लोणखेडी, चौगाव, गोताणे, कुंडाणे तसेच लाभक्षेत्रात येणाऱ्या गावातील शेतकरी उपस्थित होते.

## अलकनंदा वाघ यांना समाज भूषण पुरस्कार

धुळे, दि.७- समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांच्या मदतीसाठी सातत्याने कार्यरत राहून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या श्रीमती अलकनंदा गोविंद वाघ अर्थात मीना वाघ यांच्या उल्लेखनीय समाजकार्याची दखल घेत त्यांना समाज भूषण या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

राष्ट्रीय मानवाधिकार एवं सामाजिक न्याय फाउंडेशन यांच्या वतीने जळगाव येथे आयोजित राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार सोहळा दि. ४ ऑक्टोबर रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अलखनंदा वाघ या सध्या मलेशिया-बाली दौऱ्यावर असल्याने त्या पुरस्कार सोहळ्यास प्रत्यक्ष उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीत हा सन्मान प्रदान करण्यात आला.


**पाहिजेत**

नवी क्रेटा गाडीसाठी कायमस्वरुपी व अनुभवी चालकाची आवश्यकता आहे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
9822408140

**पाहिजे**

कापड दुकानात सोफा कारागीर इतर सेल्समन काम करणारे जेन्टस/ लेडिज लावणे आहे.
राकेश कापड दुकान
9423941247

**होम ट्यूटर**

घरी येऊन क्लास (ट्यूशन) घेतले जाईल.
-: विषय :-
Physics, Maths, Chemistry, Biology Science
5 th to 12 th
-: संपर्क :-
प्रो.जितेंद्र निकम
9665173176
9637566046


## निधन वार्ता

### तुकाराम पाटील



शहादा,दि.७- येथील रहिवासी तुकाराम सोमजी पटेल यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता राहत्या घरून शंकरनगर, शहादा येथून काढण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते जायण्टसचे फेडरेशन डायरेक्टर प्रा.आर. टी. पटेल,विनायक तुकाराम पटेल यांचे वडील होत.

### कमलाबाई चौधरी

धुळे, दि. ७- शहरातील देवपूरात राहणाऱ्या कमलाबाई काळू चौधरी यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. ८ ऑक्टोबर सकाळी आठ वाजता नेहरू चौकातील भाई मदाने नगरातून काढण्यात येणार आहे.यांच्या पश्चात कैलास काळू चौधरी, किशोर काळू चौधरी, संतोष काळू चौधरी, प्रकाश काळू चौधरी आणि अन्य सदस्य आहेत. त्या माजी नगरसेवक कैलास चौधरी यांच्या त्या मातोश्री होत.

फोटो- रतनलाल

### रतनलाल कोटेचा



धुळे, दि.७- शहरातील ग.नं.७ खुनी मस्जिद समोरील रहिवासी रतनलाल मोतीलाल कोटेचा यांचे समाधी मरण झाले आहे. मृत्यूसमयी ते ९७ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा दि.८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरा-पासून काढण्यात येणार आहे.


सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

Godrej

27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर .



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट

BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
फायनान्सला लागणारी कागदपत्रे 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०